❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



अखेर मनातलं ओठांवर आलंच

... हा सगळा खेळ सत्तेसाठी : प्रशांत भूषण यांचा व्हिडिओ शेअर करत मुख्यमंत्री फडणवीसांचा घणाघात



■ मुंबई (दै. संध्या)

दिल्लीतील इंडिया आघाडीशी संबंधित आंदोलनावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी पत्रकार परिषदेत सत्तांतराची गरज असल्याचे विधान केल्याचा व्हिडीओ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावर शेअर केला. या विधानाच्या आधारे त्यांनी आंदोलनाच्या उद्देशावर प्रश्न उपस्थित करत विरोधकांवर निशाणा साधला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांपासून सुरू झालेल्या आंदोलनामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप त्यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून प्रशांत भूषण यांचा हा व्हिडिओ शेअर करत इंडिया आघाडीच्या आंदोलनाच्या मुख्य हेतूवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. फडणवीस यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, "It's done bro, everything is exposed!! Afterall, it was all about 'Regime Change'.. अखेर मनात लपलेली गोष्ट ओठांवर आलीच."

फडणवीस यांनी विरोधकांवर गंभीर आरोप करत पुढे म्हटले आहे की, हा संपूर्ण खेळ केवळ सत्तेसाठी सुरू आहे. मग त्यासाठी विद्यार्थ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या भावना भडकवणे असो, जाती-धर्माच्या आणि भाषेच्या नावाखाली समाजात द्वेष पसरवणे असो, किंवा देशातील महत्त्वाच्या घटनात्मक संस्थांची प्रतिमा मलीन करणे असो; या आंदोलनाच्या आडून केवळ देशात अराजकता माजवण्याचा विरोधकांचा मूळ उद्देश आता उघड झाला आहे. देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही याच मुद्द्यावरून काँग्रेस आणि विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला आहे. देशातील तरुणांची माथी भडकवण्याचे काम सुरू असून, लोकशाहीतील घटनात्मक संस्थांना जाणीवपूर्वक कमकुवत करून देशात आग लावण्याचा विरोधकांचा एकमेव अजेंडा असल्याचा गंभीर आरोप राजनाथ सिंह यांनी केला आहे. राजकीय स्वार्थासाठी देशातील युवकांचा वापर केला जात असून, अगदी 'बांगलादेश'च्या धर्तीवर भारतातही सत्तांतर घडवून आणण्याचा डाव आखला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे, सीजेपीच्या मंचावरील नेहा बोरा यांनी एका पत्रकार परिषदेत उघडपणे बांगलादेशचा आदर्श समोर ठेवण्याचे विधान केले होते. यावरून विरोधकांचा छुपा आणि विघातक अजेंडा आता स्पष्टपणे देशासमोर आला असल्याचे राजनाथ सिंह यांनी सांगितले आहे.

> सत्ता मिळत नाही, तर सत्तेवर बसलेल्यांना बदनाम करा, असं धोरण विरोधीपक्षाकडून राबवलं जात असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. राहुल गांधी हे लोकसभेचे विरोधीपक्ष नेते आहेत. त्यांनी देशाची बदनामी चालवली आहे. देशासह विदेशातही ते देशाची बदनामी करत आहेत. त्यांनी अराजकता पसरवण्याचं काम करु नये, असं म्हणत शिंदेंनी राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे. आनंद दुबे यांच्या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमानंतर एकनाथ शिंदे पत्रकारांशी बोलत होते. आनंद दुबे यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे त्यांना शुभेछा देतो अभिनंदन करतो. गेले अनेक वर्ष त्यांना शिवसेनेत काम करताना पाहत आहे. राष्ट्रीय स्तरावर आपल्याशी संपर्कात असणारा अशा प्रकारचा कार्यकर्ता आहेत. नवरात्रीच्या मंगलमय पर्वामध्ये त्यांचा प्रवेश होत आहे. त्यांनी त्यांच्या भावना बोलून दाखवल्या आहेत.

थोडक्यात...

नेहा बोरा पोलिसांच्या ताब्यात : अभिजीत दिपके

नवी दिल्ली : दैनिक संध्या

कॉकरोच जनता पार्टीने दिल्लीतील कनॉट प्लेस येथील सेंट्रल पार्कमध्ये 'लहरा दो तिरंगा' रॅलीचे आयोजन केले होते. मात्र, आजूबाजूच्या परिसरात कलम १६३ लागू करण्यात आले, ज्यामुळे सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना प्रवेश करता आला नाही. दिपके दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेस-समाजवादी पक्षाच्या एका प्रवक्त्याच्या निवासस्थानी थांबले होते. तेथून बाहेर पडताच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. AISA च्या अध्यक्षा नेहा बोरा यांनाही मंडी हाऊस येथून ताब्यात घेण्यात आले. गेल्या सहा दिवसांत दिपके यांना ताब्यात घेण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी, जंतर मंतर आंदोलनापूर्वी १० ऑक्टोबर रोजी त्यांना विमानातून ताब्यात घेण्यात आले होते, परंतु दुसऱ्या दिवशी त्यांची सुटका करण्यात आली होती. ममता बॅनर्जी म्हणाल्या, "हे अघोषित आणीबाणीपेक्षा कमी नाही. सरकार असंतोषाच्या भीतीने आता संपूर्ण पिढीला गप्प बसवण्यासाठी धमकावण्याचा प्रयत्न करत आहे."

सतीश वाघोलेंकडे अध्यक्षपदाचा कार्यभार

मुंबई : दैनिक संध्या

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या औषध निरीक्षक पदाचा पेपर फुटल्याचे उघडकीस आल्यानंतर आयोगातील काही अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली. या गैरप्रकारामुळे संतप्त झालेल्या स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी पुण्यात सलग 10 दिवस तीव्र आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी लावून धरली होती. त्यानुसार आता अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार हा सतीश वाघोले यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणाची दखल घेत राज्य सरकारच्या वतीने मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी पुण्यात जाऊन विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली. राज्य सरकारने या गैरप्रकाराच्या चौकशीसाठी एक समिती स्थापन करण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांना दिले. तसेच, वाढता विरोध पाहता आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी स्वतःहून रजेवर जाण्याचा निर्णय घेतला. सरकारच्या आश्वासनानंतर आणि भीमनवार रजेवर गेल्याने विद्यार्थ्यांनी अखेर आपले आंदोलन मागे घेतले. विवेक भीमनवार रजेवर गेल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आयोगाचे सदस्य सतीश बबन वाघोले यांच्याकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. राज्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या आदेशानुसार या नियुक्तीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. सतीश वाघोले हे नुकतेच सप्टेंबर 2026 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगात सदस्य म्हणून दाखल झाले होते. विशेष म्हणजे, 7 सप्टेंबर रोजी स्वतः विवेक भीमनवार यांनीच वाघोले यांना सदस्यपदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली होती.

शिवसेनेचा सचिन सानप यांना पाठिंबा

■ पुणे/मुंबई (दै. संध्या)

आगामी विधान परिषद निवडणुका आणि राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यातून महत्त्वाची राजकीय भूमिका स्पष्ट केली आहे. पुणे शिक्षक मतदारसंघातील अपक्ष उमेदवार सचिन सानप यांना शिवसेनेचा अधिकृत पाठिंबा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, शेतकऱ्यांच्या मदतीवरून राजकारण करणाऱ्या विरोधकांनाही त्यांनी यावेळी खडेबोल सुनावले. पुण्यातील एका कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी विधान परिषदेच्या निवडणुकांवर भाष्य केले. ते म्हणाले की, "काही अपवाद वगळता आम्ही या निवडणुका महायुती म्हणूनच लढवत आहोत. पुणे शिक्षक मतदारसंघात शिवसेनेने सचिन सानप यांना पाठिंबा दिला आहे." यावेळी बोलताना त्यांनी महायुती विधान परिषदेच्या पाचही जागा निश्चितपणे जिंकेल, असा ठाम विश्वास व्यक्त केला.

शेतकऱ्यांना दिलेल्या 5 हजार रुपयांच्या मदतीबाबत स्पष्टीकरण देताना शिंदे म्हणाले की, "ही रक्कम केवळ 'अग्रिम' (आगाऊ) मदत म्हणून थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. यंदा दुष्काळाचे संकट मोठे असून, मुख्यमंत्री आणि सर्व मंत्र्यांनी थेट बांधावर जाऊन पाहणी केल्यानंतर तत्काळ दुष्काळ जाहीर केला आहे. सरकार कुठेही हात आखडता घेणार नसून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही राज्य आणि केंद्राने मिळून शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वस्त केले आहे."

यावेळी त्यांनी शिवसैनिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनाही मदतीचे आवाहन केले. नवरात्रोत्सवाचा खर्च कमी करून पुण्यातील नाना भानगिरे आणि आबा बागुल यांनी शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी यासाठी दिवाळी किट वाटपाचा जो उपक्रम सुरू केला आहे, तशाच प्रकारची मदत शिवसेनेच्या वतीने राज्यभर केली जाईल, असेही ते म्हणाले. विरोधकांच्या टीकेवर संताप व्यक्त करत शिंदे यांनी सुनावले की, "विरोधकांनी आधी दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली, आता जाहीर केल्यावर त्यावरही ते टीका करत आहेत. ५ हजारांची अग्रिम मदत दिली, त्यावरही त्यांचे राजकारण सुरूच आहे. आरोप करायला आणि टीका करायला अनेक संधी मिळतील, पण सध्या शेतकरी मोठ्या संकटात आहे. अशावेळी राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी बळीराजाच्या पाठीशी उभे राहण्याची आवश्यकता आहे."

■ एकनाथ शिंदे म्हणाले- महायुती विधान परिषदेच्या पाचही जागा जिंकेल, दुष्काळी मदतीवरून विरोधकांना टोला



सुप्रीम कोर्टाची माफी मागतो, पण आम्हाला न्याय हवा

आम्हाला न्यायालयावर पूर्ण विश्वास, न्यायालयाला धमक्या देणाऱ्यांवर कारवाई व्हावी : संजय राऊत



■ मुंबई (दै. संध्या)

तिरंगा फडकवणे हा गुन्हा आहे असे 1947 नंतर रा.स्व.संघाने मानले होते. त्यांनी त्यांच्या मुख्यालयावर जवळपास 40 ते 45 वर्षे तिरंगा फडकवला नव्हता. त्यांच्या दृष्टीने तिरंगा फडकवणे हा गुन्हा होता. आमच्या दृष्टीने तो सन्मान आहे, सीजेपीने तिरंगा फडकवला असेल तर अमित शहा आणि पोलिसांना राग येण्याचे काय कारण आहे? असा सवाल खासदार संजय राऊत यांनी केला आहे. सुप्रीम कोर्टाची माफी मागतो, पण आम्हाला न्याय हवा. आम्ही कोर्टाकडून अपेक्षा ठेवणार नाही तर कोणाकडून अपेक्षा ठेवणार. न्याय मिळावा म्हणूनच आम्ही सुप्रीम कोर्टाकडे जात आहोत. आम्हाला न्याय मिळेल असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे, असे राऊतांनी म्हटले आहे. तर न्यायालयाला धमक्या देणाऱ्यांवर कारवाई व्हावी असेही त्यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, सुप्रीम कोर्ट ही देशातील सर्वात महत्त्वाची संविधानिक संस्था आहे. सरकारकडून संविधानाचा जो अपमान होत आहे त्याचे रक्षण करण्याची जबाबदारी सुप्रीम कोर्टाची आहे त्याबद्दल आम्हाला आदर आहे. ज्ञानेश कुमार यांनी मतदार याद्यांमधील 13 कोटी नावे काढली आहेत ते सुद्धा संविधानिक पदावर बसले आहेत, ते भाजपचे एजंट आहे. सरकार आणि ज्ञानेश कुमार यांची मिलीभगत आहे ते जर संविधान आणि मतदारांचा अपमान करत असेल तर लाखो लोकं सुप्रीम कोर्टाच्या दारात उभे राहिले, कोर्टाने आमची याचिका दाखल करुण घेतली, आम्ही कोर्टाचा आदर करतो. संजय राऊत म्हणाले की, देशातील 13 कोटी मतदारांना वगळण्यात आले आहे, त्यांना न्याय मिळाला पाहिजे. एसआयआरमुळे देशात अनागोंदी माजली आहे त्यांना न्याय द्यावा. अंकिता भंडारीच्या खून खटल्यामध्ये केंद्र सरकारने ज्या व्हीआयपीला संविधानाचे सरंक्षण दिले आणि राज्यपाल केले, त्या अंकिता भंडारीच्या माता-पित्यांना न्याय द्या. शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा खटला गेली साडेचार वर्षे झाली आम्ही सुप्रीम कोर्टात लढतो आहोत. 4 मुख्य न्यायाधीश बदलले, घटनाद्रोही सरकार महाराष्ट्रात बसवले गेले पण आम्हाला न्याय मिळाला नाही. सुप्रीम कोर्ट हे कोट्यावधी अन्यायग्रस्त जनतेच्या आवाज आहे. म्हणून आम्ही सर्व जण त्यांच्याकडे जात असतो.

संजय राऊत म्हणाले की, देश आज खदखदतो आहे कारण अमित शहांनी सर्व संविधानिक संस्थावर दबाव आणला आहे. ते धमक्या देत आहे. न्यायालय जे म्हणतय की आम्हाला धमक्या देऊ नका त्यांचा रोख अमित शहा यांच्याकडे असेल. ते गद्दारांना दबाव आणत हवा तो न्याय मिळवून देत आहेत. यावर सुद्धा न्यायव्यवस्थेला एक भूमिका घ्यावी लागेल. माझ्या पक्षाला न्याय मिळाला पाहिजे, मला खात्री आहे की आम्हाला न्याय मिळेल. सुप्रीम कोर्टाकडून कोणाचे नाव घेण्यात आले नसले तरी सुप्रीम कोर्ट बार असोशिएशन यांनी माझे नाव घेतले आहे. न्यायालयात खटला चालला तर आम्ही लढू पण माझी तशी काही भावना नव्हती. आणि मी सुप्रीम कोर्टाची माध्यमांसमोर माफी मागितली आहे.

फडणवीसांनी शुद्धीकरण म्हणजे काय समजून घ्यावे

संजय राऊत म्हणाले की, मृत पावलेल्या मतदारांच्या ठिकाणी जात भाजपचे लोकं मतदान करतात. हे रेकॉर्डवर आले आहे. अनेक लाखो जिंवत लोकं आहेत त्यांना मृत दाखवले आहे. हे सगळे मेलेले जिंवत झालेले लोकं आदित्य ठाकरे, राहुल गांधी यांनी दाखवले आहेत. याला शुद्धीकरण म्हणतात का? शुद्धीकरण म्हणजे काय हे राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी समजून घेतले पाहिजे. घोटाळ्याचा आता नवीन मार्ग मुख्यमंत्र्यांना शोधावा लागेल. त्यांनी निवडणूक आयोगाला घरगडी समजू नये.

कर्नाटकातील रेकॉर्ड गहाळ, बंगालमध्ये EVM जळाल्या

ज्ञानेश कुमारांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करा; हर्षवर्धन सपकाळ यांचा हल्लाबोल

■ वाशिम (दै. संध्या)

"कर्नाटकमधील निवडणूक रेकॉर्ड गहाळ होणे, पश्चिम बंगालमध्ये ईव्हीएम मशिन्स जळणे आणि कोणतीही कायदेशीर तरतूद नसताना केवळ 'एसआयआर'च्या (SIR) नावाखाली कोट्यवधी मतदारांची नावे मतदारयादीतून वगळणे, हे सर्व प्रकार निवडणूक आयोग भारतीय जनता पक्षाचा हस्तक बनल्याचे सिद्ध करतात. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे लोकशाही बुडवण्याचे काम करत आहेत. त्यामुळे काँग्रेसची 'वोट चोर, गद्दी छोड़' ही घोषणा आता सर्वार्थाने खरी ठरत असून त्याला सर्व बाजूंनी बळ व भक्कम पुरावे मिळत आहेत. मोदी आणि शहा हे 'रंगा-बिल्ला' आता 'तो मी नव्हेच'चे नाटक करत असून त्यांचा बुरखा फाटला आहे. त्यामुळे ज्ञानेश कुमार यांच्यावर तत्काळ देशद्रोहाचे गुन्हे दाखल करून त्यांना अटक करावी," अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. वाशीम येथे पत्रकारांशी संवाद साधताना हर्षवर्धन सपकाळ यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाची संशयास्पद भूमिका, दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना



जाहीर झालेली ५ हजारांची तुटपुंजी मदत, मंत्र्यांचे चोचले आणि व्हीआयपी गाड्यांसाठी सरकारने मंजूर केलेल्या १२ कोटींच्या उधळपट्टीवरून राज्य व केंद्र सरकारवर जोरदार प्रहार केला. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरून घेतलेल्या आक्षेपांच्या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, कर्नाटकमधून निवडणुकीचे अधिकृत रेकॉर्ड गायब होणे, बंगालमध्ये ईव्हीएम मशिन्स जळून खाक होणे आणि मतदारांची नावे बेकायदेशीरपणे एसआयआरच्या माध्यमातून यादीतून उडवणे, हे देशातील लोकशाही संपवण्याचे पूर्वनियोजित षड्यंत्र आहे. या संपूर्ण मतचोरी प्रकरणातून सुटका करून घेण्यासाठी मोदी आणि शहा ही 'रंगा आणि बिल्ला'ची जोडी 'तो मी नव्हेच'चे नाटक करत आहे. मात्र, जनता आता सर्व जाणून चुकली आहे. लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या ज्ञानेश कुमार यांच्यावर तातडीने देशद्रोह आणि राष्ट्रद्रोहाचा गुन्हा नोंदवून खटला चालवावा व त्यांना गजाआड करावे. राज्यातील दुष्काळग्रस्त परिस्थिती आणि सरकारच्या आर्थिक उधळपट्टीवर ताशेरे ओढताना सपकाळ म्हणाले, दुष्काळात सर्वस्व गमावून बसलेल्या शेतकऱ्याला द्यायला सरकारकडे केवळ 5 हजार रुपये आहेत. शेतकऱ्यांना मदत देण्याची वेळ येते तेव्हा सरकारकडे 'पैसे नाहीत' अशी रड सुरू होते. एका बाजूला शेतकरी हवालदिल झालेला असताना सत्ताधारी मंत्री मात्र खुशाल जनतेच्या पैशावर काजू-बदाम खात आहेत. दुष्काळात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून व्हीआयपींसाठी १२ कोटी रुपयांच्या नव्या, चकचकीत आणि वातानुकूलित गाड्या खरेदी केल्या जात आहेत. या सरकारचा बेशरमपणा वेळोवेळी त्यांच्या वर्तणुकीतून जनतेसमोर उघड होत आहे.

डोंगराळेतील 'त्या' चिमुरडीला अखेर न्याय

बालिकेवरील बलात्कार अन् खूनप्रकरणी नराधम विजय खैरनारला फाशीची शिक्षा

■ मालेगाव (दै. संध्या)



अवघ्या महाराष्ट्राच्या काळजाचा ठोका चुकवणाऱ्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील अवघ्या साडेचार वर्षांच्या चिमुकल्या बालिकेवरील अमानुष लैंगिक अत्याचार आणि निर्घृण खून खटल्यात न्यायालयाने अत्यंत कठोर व ऐतिहासिक निकाल सुनावला आहे. मालेगाव अप्पर जिल्हा व सत्र न्यायालयाने (फास्ट ट्रॅक कोर्ट) या विकृत गुन्ह्यातील दोषी नराधम आरोपी विजय ऊर्फ शेखर खैरनार (वय 24) याला थेट फाशीची (मृत्युदंडाची) शिक्षा ठोठावली आहे. या निकालाने संपूर्ण पीडित कुटुंबाला आणि न्यायासाठी आक्रोश करणाऱ्या जनतेला मोठा दिलासा मिळाला असून, पीडितेच्या कुटुंबीयांना शासनाकडून 10 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत, अशी माहिती ज्येष्ठ विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी दिली. अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश के. जी. पालदेवार यांच्या न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल जाहीर केला. न्यायालयाने यापूर्वीच आरोपी खैरनार याला अपहरण, बलात्कार (पोक्सो), पुरावे नष्ट करणे आणि निर्घृण खून या सर्व कलमांखाली दोषी ठरवले होते. शिक्षेच्या मुद्द्यावर झालेल्या सखोल युक्तिवादानंतर आज अखेर दोषीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. जनतेचा तीव्र आक्रोश आणि प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली होती. त्यांनी न्यायालयात सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निवाड्यांचे दाखले देत सुमारे 50 मिनिटे टोकदार युक्तिवाद केला. डोंगराळे गावातील लहान मुले आरोपी विजय खैरनार याला 'दादा' म्हणून संबोधत असत. खेळणाऱ्या लहान मुलांमध्ये पीडिता ही एकुलती एक निष्पाप मुलगी होती. त्या नात्याचा आणि विश्वासाचा गैरफायदा घेऊन आरोपीने हे अमानवी कृत्य केले.

विचारपूर्वक रचलेला कट

16 नोव्हेंबर रोजी ही बालिका इतर मित्रांसोबत खेळत असताना तिला चॉकलेटचे आमिष दाखवून आरोपी घेऊन गेला. सुरुवातीला आपल्याला कोणी पाहिले आहे का, याची त्याने गावात चाचपणी केली. यावरून हे कृत्य भावनेच्या भरात नसून पूर्णपणे पूर्वनियोजित आणि विचारपूर्वक केले असल्याचे ॲड. निकम यांनी सिद्ध केले.

संपादकीय

सहकारातील सत्ताकेंद्रीकरणाला न्यायालयाचा दणका की दिग्गजांचा गेम?

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसंदर्भातील मुंबई उच्च न्यायालय, कोल्हापूर खंडपीठाचा दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजीचा निकाल हा देशातील सहकारी संस्था. सहकारी बँका. पतसंस्था. सहकारी साखर कारखाना. सूत गिरणी.कृषी उत्पन्न बाजार समिती. दूध संघासह सर्वांना लागू होणार आहे. तथापी या निर्णयाविरुद्ध उमेदवारी रद्द करण्यात आलेले उमेदवार सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे समजते.त्यावर सर्वोच्च न्यायालय कोल्हापूर खंडपीठाच्या निर्णयाला स्थगिती देणार का?...यावरच जिल्हा बँकेतील उमेदवारांच्या निश्चितीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे असे वाटते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या निवडणुकी संदर्भात मुंबई उच्च्य न्यायालयाच्या कोल्हापूरच्या खंडपीठाने धक्कादायक निकाल दिलेला आहे. सलग १० वर्षे संचालक असलेल्या व्यक्तींना पुढील पाच वर्षे निवडणूक लढवता येणार नाही असे न्यायालयाने आपल्या निकाल पत्रात म्हटलेले आहे. या निकालाने दिग्गज राजकीय नेत्यांची कोंडी झाली आहे. काँग्रेस राष्ट्रवादीतून भाजपमध्ये आलेल्या दिग्गजाचा आरबीआयच्या आदेशाच्या आडून भाजपनेच गेम केला. असल्याची या निकालानंतर सहकार क्षेत्रात सुरू झालेली आहे.सध्या राज्यात सातारा. सांगली. कोल्हापूर. सोलापूर. यवतमाळ. जळगाव.अहिल्यानगर. या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाची निवडणूकीची रणधूमाळी सुरू आहे. तर पुणेसह व अन्य जिल्ह्यातील जिल्हा बँकांच्या संचालक मंडळाचे निवडणूक आगामी कालावधीत होणार आहे.या निवडणूकीत महायुती सरकारमधील मंत्री हसन मुश्रीफ.शिवेंद्रराजे भोसले. खासदार नितीन पाटील. जयकुमार गोरे. बाबासाहेब पाटील. दत्ता मामा भरणे.दिलीप वळसे पाटील. खासदार उदयनराजे भोसले. नितीन पाटील. विशाल पाटील.संग्राम थोपटे यांच्यासह २७ हून अधिक दिग्गज नेत्यांच्या बँकिंग रेगुलेशन ॲक्ट मुळे अडचणी वाढल्या असून प्रस्थापित संचालकांचा पत्ता कट होऊन सहकार क्षेत्रात नव्या चेहऱ्यांना संधी मिळू शकते. बँकिंग नियमन कायद्यात नेमकी सुधारणा काय केली आहे?असा संभ्रम सर्व सहकारातील मंडळींना पडलेला आहे. नागरी आणि सहकारी बँकिंग क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र सरकारने बँकिंग नियमन कायद्यामध्ये सुधारणा केलेली आहे. त्यात कलम १०ए नुसार जिल्हा आणि नागरी सहकारी बँकांमधील दहा वर्षे किंवा त्याहून अधिक काळ संचालक राहिलेल्या व्यक्तीला पुढील निवडणूक लढविण्यास कायदेशीर बंदी घातली आहे. हे कलम बँकेच्या संचालक मंडळाच्या रचनेशी आणि त्यांच्या पात्रतेशी संबंधित आहे. बँकेच्या संचालक मंडळातील एकूण सदस्यापैकी किमान ५१टक्के संचालकंपैकी किमान दोन संचालकांना शेती. ग्रामीण अर्थव्यवस्था. सहकार किंवा लघुउद्योग क्षेत्रातील विशेष ज्ञान किंवा अनुभव असणे अनिवार्य आहे. अध्यक्ष किंवा पूर्णवेळ संचालक वगळता इतर संचालक सलग आठ वर्षापेक्षा जास्त काळ संचालक पदावर राहू शकत नाही. जर एखाद्या बँकेचे संचालक मंडळ या नियमांचे पालन करत नसेल तर रिझर्व बँक ते मंडळ पुन्हा स्थापन करण्याचे आदेश देऊ शकते. व नियम न पाळणाऱ्या संचालकांना हटवू शकते.आणि त्या संचालक पदाच्या जागेवर नवीन व्यक्ती संचालक म्हणून नियुक्त करू शकते. आरबीआयने बँकिंग नियमन कायद्यामध्ये केलेल्या सुधारणाची सहकारातील जेष्ठ मंडळींनी धास्ती घेतलेली आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या निवडणुकीत अनेक दिग्गजांनी स्वतःसह निकटवर्तीय यांचे व नातेवाईकांचे पर्यायी अर्ज भरलेले आहेत. अर्ज माघारीची प्रक्रिया सुरू असतानाच न्यायालयाचा निकाल समोर आलेला आहे. राज्यातील सहकार क्षेत्रावर प्रभाव राहिलेल्या काँग्रेस. राष्ट्रवादी काँग्रेस. मधील मातब्बर आज भारतीय जनता पक्षात कार्यरत आहेत. त्यांची सद्दी संपवण्याचा पद्धतशीर डाव भाजपने टाकला आणि तो तडीस नेला जात असल्याची चर्चा आता सहकार वर्तुळात सुरू झालेली आहे. मूळ काँग्रेस राष्ट्रवादीची विचारधारा असलेल्या आणि सध्या भाजपवासी असलेल्या जुन्या मातब्बर नेत्यांना बाजूला सारण्याचा भारतीय जनता पक्षाने पद्धतशीर प्रयत्न सुरू केलेला आहे. त्या जागी भाजपामधील नव्या फळीला आपल्या विचाराचे सहकारी बँकांच्या संचालक मंडळात बसविण्याचा भारतीय जनता पक्षाचा डाव असल्याचे देखील बोलले जात आहे. त्यामुळे सध्या सहकार क्षेत्रामधील नेत्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झालेली आहे. भाजपच्या सत्ताकाळातच बँकिंग रेगुलेशन ॲक्ट मध्ये सुधारणा झाली आहे. त्याचा फटका काँग्रेस आणि राष्ट्रवादीतून भाजपमध्ये गेलेल्या नेत्यांना बसलेला आहे. व आगामी कालावधीत बसणार आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत दिग्गज नेत्यांचे अर्ज सहकार निबंध तथा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी छाननी मध्ये वैध ठरवले. मात्र उच्च न्यायालयाचा निकाल हादरा देणार आहे. यामागे सत्ताधारी भारतीय जनता पक्षाची पद्धतशीर खेळी असू शकते अशी संशयाला जागा असल्याची जोरदार चर्चा आहे. भविष्यात त्याची नक्कीच पोलखोल होईलच अशी प्रतिक्रिया सहकारातील जाणकार देत आहेत. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अर्ज वैध ठरवले. परंतु उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट ब्रँचने त्या उलट निकाल दिला आहे संपूर्ण निकाल पत्र हातात आल्यानंतरच कोणत्या निकषांच्या आधारे न्यायालयाने हा निर्णय दिला याची स्पष्टता येईल अशी प्रतिक्रिया सहकारातील जाणकार कायदे तज्ञांनी दिलेली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाचा हा निकाल केवळ संचालकांच्या दहा वर्षांच्या सलग कार्यकाळापुरता मर्यादित नसून, सहकारातील लोकशाही मूल्ये आणि सुशासनाच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण आहे. पूर्वी निवडणूक प्राधिकरणानेही अपात्र व्यक्तींना निवडणूक लढविण्यापासून रोखण्याची भूमिका याच व्यापक उद्देशाने घेतली होती. कारण, अपात्र व्यक्ती निवडून आल्यानंतर त्यांची निवड रद्द करण्यासाठी नंतर कायदेशीर प्रक्रिया करण्यापेक्षा, त्यांना सुरुवातीलाच निवडणुकीत सहभागी होण्यापासून रोखणे हा अधिक योग्य आणि परिणामकारक मार्ग आहे. मात्र, या भूमिकेच्या विपरीत व वेगळी अशी राज्य सरकारकडून घेतलेल्या भूमिकेमुळे पात्रतेच्या छाननीबाबत प्रश्न निर्माण झाले. उच्च न्यायालयाने कायद्याच्या मूळ उद्देशाचे आणि त्यामागील स्पिरिटचे अचूक आकलन करून सत्तेचे केंद्रीकरण.आणि पदावरील दीर्घकालीन मक्तेदारी टाळण्याच्या तत्त्वावर नेमके बोट ठेवले आहे.असे दिसत आहे. एका अर्थाने, या निकालाने राज्य सरकारच्या डोळ्यांतही अंजन घातले आहे. सहकार क्षेत्रात व्यक्तीपेक्षा संस्था, पदापेक्षा तत्त्वे आणि सत्तेपेक्षा कायद्याचे राज्य महत्त्वाचे असते. संचालकपद ही कायमस्वरूपी मक्तेदारी नसून, नव्या पात्र व्यक्तींना संधी मिळणे हा सहकारातील लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे. यापूर्वी सहकार खात्याशी संबंधित मंत्र्यांच्या निर्णयांबाबत उपस्थित झालेल्या कायदेशीर प्रश्नांचाही याच दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक आहे. या प्रकरणाशी संबंधित प्रतिष्ठित व्यक्ती, लोकप्रतिनिधी आणि मंत्री यांनीही न्यायालयीन निर्णयांचे गांभीर्य आणि जनमानसात निर्माण होणाऱ्या प्रतिमेचा विचार करावा. आता तरी निवडणूक प्रक्रियेतील पात्रतेचे निकष काटेकोरपणे लागू करून, सत्ताकेंद्रीकरण रोखण्याच्या आणि कायद्याच्या मूळ भावनेनुसार सहकाराचा कारभार चालविण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली जातील, ही अपेक्षा बाळगली पाहिजे.



महिलांच्या योगदानाची जाणीव हाच त्यांच्या सन्मानाचा पाया : पवार

■ पुणे (दै. संध्या)

महिलांना विविध आघाड्यांवर अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यांच्या या प्रयत्नांची आणि योगदानाची जाणीव ठेवणाऱ्या पुरुषांच्या मनात महिलांविषयीचा आदर आपोआप वाढतो, असे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी केले.

महावितरणमध्ये कार्यरत असलेल्या महिलांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी गणेशखिंड येथील प्रकाशभवन सभागृहात बुधवारी (दि. १४) आयोजित करण्यात आलेल्या 'सन्मान सौदामिनींचा' या विशेष सोहळ्यात ते बोलत होते.



या कार्यक्रमाला प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, सुरेश सवाईराम, सहायक महाव्यवस्थापक (विवले) कीर्ती भोसले, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सत्यजित राजेशिर्के व दीप्ती अंबेकर, कार्यकारी अभियंता अपर्णा मुनशेट्टीवार, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भूपेंद्र वाघमारे, उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पटणी यांच्यासह महावितरणमधील महिला अभियंता, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर म्हणाले की, कालबाह्य झालेल्या कर्मचारी कल्याण योजनांना काळानुरूप स्वरूप देतानाच संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत भरघोस वाढ केली आहे. महिला एकदा एखादे काम पूर्ण करण्याचा निर्धार करतात, तेव्हा ते पूर्ण केल्याशिवाय मागे हटत नाहीत. त्यांच्या या जिद्दीचा आणि कर्तृत्वाचा गौरव होणे आवश्यक आहे.यावेळी कार्यकारी अभियंता अपर्णा मुनशेट्टीवार, जलतरणपटू नेहा बनसोड, हिना कुरणे, अनिता वाकसे, भाग्यश्री जोशी, नितल हासे, शितल बोथे आणि सुरभी टाकसाळे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील अनुभव आणि वाटचालीतील विविध पैलू उपस्थितांसमोर मांडले.कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्व महिलांचा गुलाबपुष्प आणि पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भक्ती जोशी व स्वागती सोळंकुरे यांनी केले, तर आभार अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांनी मानले.

जुन्नर-आंबेगावला दुष्काळ जाहीर

■ नारायणगाव(दै. संध्या)

खरीप हंगामात पावसाने दिलेली ओढ, पिकांचे झालेले नुकसान आणि पाणी व चारा टंचाईमुळे संकटात सापडलेल्या जुन्नर व आंबेगाव तालुक्यांचा अखेर दुष्काळी तालुक्यांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये जुन्नर आणि आंबेगाव या दोन्ही तालुक्यांचा समावेश झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आमदार दिलीप वळसे पाटील यांनी यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

राज्य शासनाने २५ सप्टेंबर रोजी जाहीर केलेल्या २६५ दुष्काळी तालुक्यांच्या यादीत जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांचा समावेश करण्यात आला नव्हता. त्यामुळे या भागातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये नाराजी होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन आमदार दिलीप वळसे पाटील यांनी दोन्ही तालुक्यांतील आदिवासी, डोंगरी आणि टंचाईग्रस्त भागांचा दौरा केला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी केली आणि दुष्काळाची तीव्रता जाणून घेतली.

त्यानंतर ६ ऑक्टोबर रोजी त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांना पत्र देऊन जुन्नर व आंबेगाव तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती. या मागणीचा शासनाने विचार केल्याने दोन्ही तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश झाला आहे.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांना जीपीएस प्रणालीचा वापर करून छायाचित्रांसह पीक नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नुकसान भरपाईसंदर्भातील स्वतंत्र शासन निर्णय लवकरच जाहीर होणार आहे. दुष्काळी तालुक्यांच्या यादीत समावेश झाल्यामुळे शेतकऱ्यांना जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुलीस स्थगिती आणि कृषिपंपांच्या वीजबिलात सवलत अशा विविध उपाययोजनांचा लाभ मिळणार आहे.

रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थतर्फे २९ ऑक्टोबरला 'रोटरी स्पेल बी स्पर्धा'

■ पुणे (दै. संध्या)

विद्यार्थ्यांचे इंग्रजी शब्दलेखन कौशल्य विकसित करणे, भाषिक आकलन वाढवणे आणि त्यांच्यात आत्मविश्वासासह निरोगी स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करणे, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थतर्फे 'रोटरी स्पेल बी स्पर्धा २०२६-२७'चे आयोजन करण्यात आले आहे.ही स्पर्धा गुरुवार,२९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत सिम्बायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंग, गोखले क्रॉस रोड, मॉडेल कॉलनी, पुणे येथे होणार आहे. पुण्यातील विविध शाळांमधील इयत्ता सहावी, सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थच्या ६६ वर्षांच्या गौरवशाली सेवापरंपरेत शैक्षणिक उपक्रमांना विशेष महत्त्व आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या या प्रयत्नांचा भाग म्हणून स्पेल बी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना इंग्रजी शब्दलेखनातील प्रभुत्व दाखवण्याची संधी देण्याबरोबरच त्यांची एकाग्रता, भाषिक आकलन, स्मरणशक्ती आणि प्रसंगावधान या गुणांचा विकास करणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. स्पर्धेत लेखी आणि मौखिक स्वरूपाच्या एकूण पाच आव्हानात्मक फेऱ्या होणार आहेत. इंग्रजी भाषेतील शब्दांचे अचूक लेखन, शब्दांची ओळख आणि भाषेवरील प्रभुत्व अशा विविध कौशल्यांची या फेऱ्यांमध्ये चाचणी घेतली जाणार आहे.

भोरवाडीत घरावर दगडफेक करणाऱ्या तिघांना कोठडी

■ नारायणगाव(दै. संध्या)

खोडद ग्रामपंचायत हद्दीतील भोरवाडी येथे एका कुटुंबाच्या घरावर दगडफेक करून, वाहनांचे नुकसान करत कोयत्याचा धाक दाखवल्याप्रकरणी नारायणगाव पोलिसांनी दहा जणांवर गुन्हा दाखल केला आहे. यापैकी तीन आरोपींना मंगळवारी रात्री अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्यांना शनिवार पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

प्रसाद चिंतामण हिंगे (वय ३२), निरंजन ज्ञानेश्वर खिल्लारी (वय ३१) आणि ओंकार राजु काळे (वय २६) सर्व रा. खोडद, गडाचीवाडी, ता. जुन्नर अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

रितीका प्रशांत राजपूत (वय २२, रा.भोरवाडी) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.१२ ऑक्टोबरला मध्यरात्रीच्या सुमारास सुमारे दहा जणांच्या टोळक्याने राजपूत यांच्या घरावर दगडफेक केली. यात घराचे सिमेंटचे पत्रे,समोरील दुचाकी आणि मोटारीचे नुकसान झाले. आरोपींनी हातात कोयते घेऊन कुटुंबाला शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी देत परिसरात दहशत निर्माण केली. सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण संपांगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी घटनेचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. इतर फरार आरोपींचा शोध सुरु आहे.

पतीच्या निधनानंतर वृत्तपत्र विकून सुरेखा ताई खैरे यांनी सावरला संसार

■ नारायणगाव(दै. संध्या)

आयुष्यात एकामागून एक संकटे आली, पतीची साथ सुटली, त्यानंतर आधार देणाऱ्या भावाचेही निधन झाले. डोक्यावर कर्जाचा डोंगर आणि भावाच्या तीन लहान मुलांच्या भविष्याची जबाबदारी अशा परिस्थितीतही सुरेखा वसंतराव खैरे यांनी हार मानली नाही. स्वतःच्या दुःखावर मात करत पहाटे चार वाजल्यापासून वृत्तपत्र वितरणाचे काम करून त्यांनी तीन भाच्यांना उच्चशिक्षण दिले आणि त्यांचे आयुष्य घडविले. वारूळवाडी येथील ५७ वर्षीय सुरेखा खैरे यांचा ३० वर्षांचा हा जिद्द, कष्ट आणि माणुसकीचा प्रवास समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

सुरेखा खैरे यांचा जन्म १६ डिसेंबर १९६८ रोजी वारूळवाडी येथील दशरथ गोविंद वारुळे यांच्या कुटुंबात झाला.



वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी वडिलांचे छत्र हरपल्याने त्यांचे शिक्षण अर्धवट राहिले. त्यांचे थोरले बंधू अशोक यांनी त्यांचा सांभाळ केला. पुढे १९९१ मध्ये नारायणगाव येथील पत्रकार वसंतराव शंकरराव खैरे यांच्याशी त्यांचा विवाह झाला. संसार व्यवस्थित सुरू असतानाच १९९५ मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने पतीचे निधन झाले. त्यावेळी त्यांच्यावर एक लाख रुपयांचे कर्ज होते.

या दुःखातून सावरण्याचा प्रयत्न सुरू असतानाच १९९६ मध्ये त्यांच्या भावाचेही निधन झाले. भावाच्या पश्चात पत्नी सुधा आणि विशाल, सुहास व ज्योत्स्ना ही तीन लहान मुले होती. स्वतःच्या आयुष्यातील आधार हरपलेला असतानाही सुरेखा यांनी भावाच्या मुलांना वाऱ्यावर न सोडता त्यांचे संगोपन आणि शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारली. उदरनिर्वाहासाठी कोणताही ठोस मार्ग नसताना सुरेखा खैरे यांना दैनिक 'लोकमत'च्या वृत्तपत्र वितरण एजन्सीचा आधार मिळाला. १९९६ मध्ये त्यांनी या व्यवसायाला सुरुवात केली. पहाटे चार वाजता उठून नारायणगाव बसस्थानकावरून वृत्तपत्रांचे गठ्ठे आणायचे आणि ते घरोघरी पोहोचवायचे.

सेट-टॉप बॉक्स किंवा ॲन्टेनाशिवाय स्मार्ट टीव्हीवर ५०० हून अधिक लाईव्ह टीव्ही चॅनेल्स

■ पुणे (दै. संध्या)

टाटा प्लेने टेलिव्हिजन स्ट्रीमिंग ॲप टाटा प्ले स्मार्ट लाँच केले आहे, जे कनेक्टेड टीव्हीवर परिचित लाईव्ह टेलिव्हिजन इंटरफेसचा अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. ग्राहकांना ५०० हून अधिक लाईव्ह चॅनेल्स मिळतील, ज्यासाठी सेट-टॉप बॉक्स, डिश ॲन्टेना किंवा वायरची गरज भासणार नाही.

टाटा प्ले स्मार्टच्या केंद्रस्थानी टाटा प्लेचा अत्यंत लोकप्रिय आणि वापरकर्ता-अनुकूल लाईव्ह टीव्ही अनुभव आहे, जो मोठ्या पडद्यासाठी तयार करण्यात आला असून होम ब्रॉडबँडद्वारे विनासायास उपलब्ध होतो. टाटा प्ले स्मार्ट ॲप कोणालाही त्यांच्या स्मार्ट टीव्हीच्या ॲप स्टोअरवरून थेट डाउनलोड करता येते, मग ते सध्या डीटीएच सेवा वापरत असोत, केबल कनेक्शन वापरत असोत किंवा कोणतीही पे-टीव्ही सेवा वापरत नसले तरीही हे शक्य आहे. हे ॲप प्रेक्षकांना कोणत्याही इंटरनेट कनेक्शनचा वापर करून त्यांच्या स्मार्ट टीव्ही, मोबाइल फोन, टॅबलेट किंवा लॅपटॉपवर लाईव्ह चॅनेल्स पाहण्याची सुविधा देते. मोठ्या पडद्यावर डीटीएचची सवय असलेल्या प्रत्येकाला हा अनुभव अत्यंत परिचित वाटेल, ज्यामध्ये चॅनेल क्रमांक, प्रोग्राम गाईड आणि रिमोट-अनुकूल कंट्रोल्स उपलब्ध आहेत. तसेच मनोरंजनाचा आनंद घेण्यासाठी हे ॲप कोणत्याही सुसंगत डिवाईसवर उघडता येते, ज्यामुळे टाटा प्लेच्या मनोरंजन अनुभवाचा परिचय आणि सहजता कनेक्टेड स्क्रीन्सच्या नव्या पिढीपर्यंत पोहोचते.

या लाँचबाबत मत व्यक्त करत टाटा प्लेचे एमडी आणि सीईओ हरित नागपाल म्हणाले, "स्मार्ट टीव्ही आणि होम ब्रॉडबँडने कनेक्टेड घरांमध्ये कन्टेन्ट पाहण्याची पद्धत बदलली असली, तरीही मोठ्या पडद्यावर खेळ, बातम्या आणि दैनंदिन मालिका लाईव्ह पाहण्याची ग्राहकांची मूळ गरज अजूनही कायम आहे. डीटीएच



सर्वसामान्य व्यक्तींपर्यंत आपली पोहोच सातत्याने अधिक दृढ करत असताना टाटा प्ले स्मार्ट इंटरनेटने जोडलेल्या (वायर्ड) शहरी घरांच्या इन्फोटेन्मेंटच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे." हे सबस्क्रिप्शन घरातील सदस्यांच्या पाहण्याच्या आवडीनिवडीनुसार डिझाइन करण्यात आले आहे. ग्राहक ज्या भाषांमध्ये कन्टेन्ट पाहतात त्या भाषांची निवड करू शकतात आणि संपूर्ण घरासाठी एका महिन्याचा प्लॅन दरमहा १९९ रुपयांपासून सुरू होतो. टाटा प्ले स्मार्ट ॲप सॅमसंग, अँड्रॉइड टीव्ही, व्हीआयडीएए, गुगल टीव्ही आणि फायरटीव्हीवर, तसेच अँड्रॉइड व आयओएस मोबाइल आणि टॅबलेट डिवाईसेसवर उपलब्ध आहे.या लाँच मोहिमेचे मुख्य आकर्षण म्हणजे लोकप्रिय अभिनेता राजकुमार राव आहेत, ज्यांनी मिश्कील आणि हलक्याफुलक्या अवतारात बाप आणि मुलगी अशा दोन्ही भूमिका सुरेखपणे साकारल्या आहेत. त्यांच्यातील विनोदी संवाद साध्या सत्यावर मजेशीरपणे भर देतो: लाईव्ह टीव्ही पाहणे आता अधिक स्मार्ट आणि विनासायास होऊ शकते. सेट-टॉप बॉक्स, डिश ॲन्टेना आणि वायर्सच्या पारंपारिक डीटीएच सेटअपच्या त्रासाला दूर करत टाटा प्लेचे हे ॲप-आधारित सोल्यूशन प्रेक्षकांना लाईव्ह टेलिव्हिजन पाहण्याचा सोपा, लवचिक आणि सुलभ मार्ग उपलब्ध करून देते.टाटा प्लेसोबत सहयोगाबाबत मत व्यक्त करत राष्ट्रीय पुरस्कार विजेते अभिनेता राजकुमार राव म्हणाले, "टाटा प्ले स्मार्टबद्दल मला सर्वात जास्त आवडलेली गोष्ट म्हणजे, आजच्या काळातील व्यक्तींच्या कन्टेन्ट पाहण्याच्या पद्धतीशी जुळवून घेताना टाटा प्ले स्मार्टने टेलिव्हिजनचे मूळ स्वरूप पूर्णपणे जपले आहे. ही मोहीम मी आजवर केलेल्या सर्व कामांपेक्षा अगदी वेगळी होती. एकाच फ्रेममध्ये बाप आणि मुलगी अशा दोन्ही भूमिका साकारताना मला केवळ रूपच नव्हे, तर मानसिकता, देहबोली आणि भावनांमध्येही सतत बदल करावा लागला. हे सर्जनशीलदृष्ट्या आव्हानात्मक होते, तरीही अत्यंत समाधान देणारे ठरले आणि यामुळे मला दोन पूर्णपणे भिन्न व्यक्तिरेखा साकारण्याची संधी मिळाली. मी व्यक्तींना जोडणारा संदेश देताना त्यांचे मनोरंजन करणाऱ्या कथांकडे नेहमीच आकर्षित होतो.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



नवरात्रोत्सवानिमित्त महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

पुणे : दैनिक संध्या

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग व हरजीवन हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्रोत्सवानिमित्त महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. १६ ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सारसबागेसमोरील हरजीवन हॉस्पिटल येथे होणार आहे, अशी माहिती ट्रस्टतर्फे देण्यात आली. शिबिराचे संयोजन डॉ. सागर रोकडे पाटील यांसह मंदिराचे सर्व विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे. शिबिरात नाडी, रक्तदाब, श्वसन दर, शरीराचे तापमान, रक्तातील ऑक्सिजनची पातळी आणि रक्तशर्करा तपासण्यात येणार आहे. तसेच संपूर्ण सीबीसी, थायरॉईड कार्यक्षमता, लिपिड प्रोफाइल, कॅल्शियम, युरिक ॲसिड आणि जीवनसत्त्व बी१२ या रक्ततपासण्यांची सुविधाही उपलब्ध असेल. तसेच महिलांसाठी दि. १८ ऑक्टोबर रोजी मॅमोग्राफी, तर दि. १७ व १८ ऑक्टोबर रोजी हाडांच्या घनतेची तपासणी करण्यात येणार आहे. यासोबतच दि. १६ ते १९ ऑक्टोबरदरम्यान रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. महिलांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा. नोंदणी व अधिक माहितीसाठी ७५१७५६९९२९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



'दिल तो है दिल'पासून 'मल्हारवारी'पर्यंत; पुणे लोकमान्य फेस्टिवलमध्ये रंगला 'गीतों का सफर'

पुणे : दैनिक संध्या

पुणे लोकमान्य फेस्टिवल नवरात्र उत्सव २०२६ मध्ये जितेंद्र भूरुक प्रस्तुत 'गीतों का सफर' या विशेष संगीतमय कार्यक्रमाने रसिकांना अजरामर मराठी आणि हिंदी गीतांची सुरेल मेजवानी अनुभवायला मिळाली. लोकप्रिय गीतांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. जुन्या आणि नव्या पिढीच्या रसिकांना भावणाऱ्या गीतांनी संपूर्ण मैफल रंगतदार झाली. या कार्यक्रमात गायक जितेंद्र भूरुक, मेधा चांदवडकर, अश्विनी कुरपे आणि आकाश सोळंकी यांनी आपल्या सुरेल आवाजात विविध लोकप्रिय गीते सादर केली. 'ये नाम रे', 'दिल तो है दिल', 'दिलबर मेरे', 'ओ मेरे दिल के', 'वल्लव रे नाखवा', 'एक हसीना थी', 'मल्हारवारी' आणि 'परदेसिया' यांसारख्या गाजलेल्या गीतांनी रसिकांची मने जिंकली. मराठी आणि हिंदी संगीताचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. गीतांची निवड, गायकांचे सादरीकरण आणि संगीताची सुरेल साथ यामुळे मैफलीला विशेष रंगत आली. या संगीतमय कार्यक्रमाला वादक कलाकार रशीद शेख, हार्दिक रावल, बाबा खान, नंदू डेव्हिड, सुनील साळवी आणि रोहित साने यांनी आपल्या वादनातून मोलाची साथ दिली. गायक आणि वादक यांच्यातील सुरेल समन्वयामुळे प्रत्येक गीताचा आनंद अधिक खुलला. लोकप्रिय गीतांच्या सादरीकरणातून जुन्या आठवणींना उजाळा मिळाल्याने रसिकांसाठी हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. अशी माहिती पुणे लोकमान्य फेस्टिवलचे संस्थापक-अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते यांनी दिली.

मुक्या जीवांना अभयदान द्या ! तुळजाभवानी मंदिरातील पशुबळी प्रथा बंद करण्याची मागणी

पुणे : दैनिक संध्या

सर्व धर्मांत प्राणी आणि पशुहत्या निषेधार्ह मानली आहे. उघड्यावर दिले जाणारे बकऱ्यांचे, कोंबड्यांचे बळी, त्यामुळे होणारे प्रदूषण, त्यातून पसरणारी रोगराई धोकादायक आहे. त्यामुळे धर्माच्या नावाखाली होणारी पशुहत्या रोखण्यासाठी कठोर कायदा करून त्याची कडक अंमलबजावणी करावी,' तुळजापूर आणि इतर ठिकाणी मंदिराच्या परिसरात दिले जाणारी पशुबळी प्रथा पूर्णपणे बंद करण्यात यावी, अशी मागणी सर्वजीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कल्याण गंगवाल यांनी केली आहे. गेल्या ३५ वर्षांपासून या प्रथेविरोधात सातत्याने प्रयत्न करत असून, सुमारे ९० टक्के पशुबळी रोखण्यात यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले आहे. नवरात्रोत्सवात तुळजाभवानी देवीसमोर मोठ्या संख्येने पशू-पक्ष्यांची बळी दिली जाते. नवस, मनोकामना आणि धार्मिक श्रद्धांच्या पूर्ततेसाठी ही प्रथा पाळली जाते. मात्र, पशुबळीमुळे मुक्या प्राण्यांना आपले प्राण गमवावे लागतात. धार्मिक श्रद्धा जपत असतानाच जीवांप्रती दया, करुणा आणि संवेदनशीलता दाखविणे आवश्यक आहे. पशुबळीसारख्या प्रथा थांबवून समाजात मानवी मूल्ये आणि विज्ञाननिष्ठ विचार रुजविण्यासाठी जनजागृती होणे गरजेचे आहे, असे मत डॉ. गंगवाल यांनी व्यक्त केले. या प्रथेला आळा घालण्यासाठी डॉ. गंगवाल यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, तहसीलदार तसेच न्यायाधीश यांना पत्रे पाठवून योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे. पशु क्रूरता निवारण अधिनियम, १९६० तसेच लागू असलेल्या इतर कायदेशीर तरतुदींच्या आधारे प्रशासनाने आवश्यक पावले उचलावीत, असे त्यांनी म्हटले आहे. या संदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्याचे आणि पशुबळी रोखण्याबाबत न्यायालयीन निर्देशांचा संदर्भ असल्याचेही त्यांनी नमूद केले. पशुबळी प्रथा पूर्णपणे बंद करण्यासाठी प्रशासनाने विशेष समिती स्थापन करावी.

देवीस्वरूप असलेल्या १०८ मुलींचे श्री महालक्ष्मी मंदिरात कन्यापूजन

■ पुणे : (दै. संध्या)

'या देवी सर्वभूतेषु, शक्तिरूपेण संस्थिता... नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः...' या मंगल स्वरांनी महालक्ष्मी मंदिराचा परिसर दुमदुमून गेला. श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबागच्या वतीने सार्वजनिक नवरात्रोत्सवानिमित्त मंदिरात बाल शिशु मंदिर आणि समर्थ विद्या मंदिर प्राथमिक शाळेतील १०८ मुलींच्या 'कन्यापूजन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कन्या पूजन हा नवरात्री पूजेचा एक अविभाज्य भाग आहे. ज्यामध्ये लहान मुलींना देवी दुर्गाच्या नऊही रूपांचे प्रतीक मानून त्यांची देवी म्हणून पूजा केली जाते. यावेळी अभिनेत्री पूजा पवार, अपूर्वा सपकाळ, मंदिर ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त व उत्सव प्रमुख डॉ.तृप्ती अग्रवाल, विश्वस्त प्रवीण चोरबेले आदी उपस्थित होते.

कन्यापूजन करताना मुलींचे पाद्यपूजन आणि औक्षण करण्यात आले. सुगंधित अत्तरपाणी मुलींवर शिंपडून त्यांचे पाद्यपूजन देखील करण्यात आले, तसेच ट्रस्टतर्फे सर्व मुलींना खाऊ आणि भेटवस्तू देण्यात आल्या. देवीनामाचा जयघोष करीत देवीस्वरूप असलेल्या लहान मुलींनी आपले पूजन होत असल्याचे दृश्य पाहिले आणि त्यावेळी प्रत्येक चिमुकलीच्या चेहऱ्यावरील आनंद काहीसा वेगळा होता.

प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल म्हणाल्या, श्री महाकाली, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती या आदिशक्तीच्या त्रिदेवी स्वरूपाचे पवित्र अधिष्ठान श्री महालक्ष्मी मंदिरात आहे.



राज्याच्या तिजोरीवर पहिला हक्क बळीराजाचा; मदतीत हात आखडता घेणार नाही

पुणे नवरात्रौ महोत्सवात महर्षी पुरस्कार प्रदान; दुष्काळग्रस्तांसाठी मदतीचा हात

■ पुणे (दै. संध्या)

राज्याची तिजोरी ही सर्वप्रथम बळीराजासाठी आहे. शेतकरी हा आपला अन्नदाता असून त्याला संकटातून बाहेर काढण्यासाठी मदत करताना सरकार कुठेही हात आखडता घेणार नाही. शेतकऱ्यांची यंदाची दिवाळी काळी होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

३२ व्या पुणे नवरात्रौ महोत्सवात आयोजित महर्षी पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे शिंदे यांच्या हस्ते ज्येष्ठ पुरातत्त्ववेत्ते व मंदिर स्थापत्यतज्ज्ञ डॉ. गो. ब. देगलूरकर, ज्येष्ठ पार्श्वगायिका उषा मंगेशकर आणि ज्येष्ठ गायक-संगीतकार श्रीधर फडके यांना मानाचे 'महर्षी' पुरस्कार प्रदान करण्यात आले.

शिंदे म्हणाले, "महाराष्ट्र आज



दुष्काळाच्या संकटाचा सामना करत आहे. बळीराजा अडचणीत असून त्याच्या पाठीशी उभे राहणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री आणि आम्ही सर्वांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांच्या मागणीनुसार तातडीने दुष्काळ जाहीर केला. मागील वर्षी अतिवृष्टी झाली होती; मात्र शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ दिली नाही. यंदाही तसे होऊ देणार नाही. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने मदतीचा हात पुढे करावा." परभणी येथे शेतकऱ्यांची भेट घेतल्यानंतर मदतीचे वाटप केल्याचे सांगून ते म्हणाले, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सामूहिक विवाह सोहळ्यांनाही सहकार्य केले जाईल. शेतकऱ्यांच्या पाठीशी लाखो हात उभे राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. नवरात्रोत्सवाच्या आयोजनाचे कौतुक करताना शिंदे म्हणाले, "समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या रत्नांचा सन्मान करून आबा बागुल यांनी खरी नवरात्र साजरी केली आहे. सलग ३२ वर्षे हा महोत्सव सुरू ठेवणे मोठे काम आहे. नऊ दिवसांत येथे सुमारे दहा लाख भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे पुण्यात मंगलमय वातावरण निर्माण होते आणि संस्कृतीचे जतन होते."आपण दिलेला शब्द पाळतो, त्यामुळे लोकांचा विश्वास संपादन केला आहे. अनेक अडथळे आले, तरी शब्द दिल्यामुळेच आपण या कार्यक्रमाला उपस्थित राहिलो, असेही त्यांनी सांगितले. उषा मंगेशकर यांच्या कार्याचा गौरव करताना शिंदे म्हणाले, लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबतच उषा मंगेशकर यांनीही संगीत क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या स्वरांनी घराघरांत भक्तिभाव जागवला. श्रीधर फडके यांनी वडील सुधीर फडके यांचा 'गीत रामायण'चा वारसा समर्थपणे पुढे नेला आहे. डॉ. गो. ब. देगलूरकर यांनी मंदिर स्थापत्य आणि मूर्तिशास्त्राच्या अभ्यासातून भारतीय सांस्कृतिक वारसा समृद्ध केला आहे.

मतदानाचे आवाहन

■ पुणे (दै. संध्या)

'जितने भी पदवीधर मतदाता हैं, उनसे मैं निवेदन करना चाहता हूँ कि डॉ. स्मिताताई योगेश जाधव को वोट देकर विजयी बनाइए।' हे ज्येष्ठ अभिनेते अमरिष पुरी यांच्या खर्जातल्या आवाजात केलेले आवाहन असो वा डॉ. स्मिताताई जाधव यांना प्रचंड बहुमताने विजयी करा, हे ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांच्या आवाजात मतदान करण्याविषयी केलेले आवाहन...या दोन्ही दिग्गज कलाकारांच्या आवाजातील हुबेहूब नक्कल करत कलाकार योगेश सुपेकर यांनी पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजप- महायुतीच्या उमेदवार डॉ. स्मिताताई योगेश जाधव यांना मतदान करण्याचे आवाहन केले. त्यांच्यासह पुण्यातील कला- सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिनिधींनीही डॉ. जाधव यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविला. रंगकर्मी, नाट्यनिर्माते, निवेदक, लावणी निर्माते आणि सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिनिधी एकत्र आले होते.

अ फॅमिली डॉग फिल्म असलेल्या 'कापूसकोंडा'चा टीझर लाँच

■ पुणे (दै. संध्या)

मानवी नाते संबंध, कुटुंब, भावभावनांवर आधारित मनोरंजक 'कापूसकोंडा' या चित्रपटाचा टीझर लाँच करण्यात आला आहे. सत्यघटनेवरून प्रेरित असलेली अत्यंत वेगळी गोष्ट, उत्तम स्टारकास्ट असलेला हा चित्रपट येत्या २३ ऑक्टोबरला प्रदर्शित होणार आहे.

पॅनोरामा स्टुडिओस प्रस्तुत व्हीपी माऊली ग्रुप ऑफ कंपनीज सह स्टोरीवाला फिल्म हा चित्रपट सादर करीत असून जास्वंद एंटरटेन्मेंट्स प्रा. लि. नी "कापूसकोंडा" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. "कापूसकोंडा" चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सचिन मोहिते यांच आहे. सचिन मोहिते, गणेश पंडित, ऋषिकेश तुरई यांनी चित्रपटाची पटकथा, संवादलेखन केलं आहे. सचिन पाटेकर यांनी छायांकनाची जबाबदारी निभावली आहे. गाणी संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांनी सुरबद्ध केली आहेत, तर पार्श्वसंगीत अभिजीत हेगडेपाटील या चित्रपटाला लाभले आहे. चित्रपटाच्या गाण्यांना गायक अवधूत गुप्ते, पद्मनाभ गायकवाड यांचा स्वरसाज लाभला आहे. सुहास राणे यांनी ध्वनी तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले आहे. अभिनेते सचिन पिळगांवकर, अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासह नवीन पिढीतील अभिनेत्री अक्षता पाडगांवकर, जान्हवी तांबट आणि अभिनेता भूषण पाटील अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण कथानकाची गरज समजून लातूर जिल्ह्यातील अंधोरी या गावी करण्यात आले आहे. "कापूसकोंडा" या चित्रपटातून सचिन पिळगावकर आणि मधुराणी गोखले बऱ्याच काळानंतर पुन्हा एकत्र आले आहेत.

राजा, राणी आणि राजकुमारी असलेल्या हॅपी गो लकी फॅमिलीची ही रंजक गोष्ट आहे.

आयव्हीएफकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो

झेनिथच्या शिबिराला १०० हून अधिक जोडप्यांचा प्रतिसाद

■ पुणे (दै. संध्या)

वंध्यत्वाबाबतची चर्चा केवळ महिलांच्या तपासण्यांपुरती मर्यादित न राहता आता दोन्ही जोडीदारांच्या प्रजनन आरोग्याकडे गांभीर्याने पाहण्याची मानसिकता निर्माण होत असल्याचे चित्र समोर आले आहे. झेनिथ ॲडव्हान्स्ड फर्टिलिटी सेंटरतर्फे आयोजिल आयव्हीएफ शिबिराला १०० हून अधिक जोडप्यांनी भेट देत तज्ज्ञांचा सल्ला घेतला, तर सल्लामसलत केलेल्यांपैकी ६२ टक्के जणांनी उपचाराच्या दिशेने पुढे जाण्याचा निर्णय घेतला. या प्रतिसादातून आयव्हीएफकडे पाहण्याच्या समाजाच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल होत असल्याचे दिसून आले आहे.

पूर्वी वंध्यत्व किंवा आयव्हीएफ याविषयी बोलण्यास अनेक जोडपी संकोच करत. सामाजिक दबाव, गैरसमज आणि उपचारांविषयी अपुरी माहिती यामुळे अनेकदा समस्या लपवली जात असे किंवा उपचार घेण्यास विलंब होत



असे. मात्र, शिबिराला मिळालेल्या प्रतिसादातून आजची पिढी वंध्यत्वाबाबत अधिक मोकळेपणाने चर्चा करत असून, उपलब्ध उपचारपद्धती समजून घेऊन प्रजनन आरोग्याबाबत माहितीपूर्ण निर्णय घेण्यास पुढे येत असल्याचे स्पष्ट झाले.

या बदलाबाबत बोलताना झेनिथ ॲडव्हान्स्ड फर्टिलिटी सेंटरच्या संस्थापक व संचालक डॉ. ममता दिघे म्हणाल्या, "आज आपण मानसिकतेत सकारात्मक बदल पाहत आहोत. आयव्हीएफ हा पूर्वीप्रमाणे निषिद्ध किंवा संकोचाचा विषय राहिलेला नाही. तो आता आरोग्यविषयक उपचारांचा एक पर्याय म्हणून अधिक मोकळेपणाने चर्चिला जात आहे."

दरम्यान, वंध्यत्वाच्या उपचारांमध्ये आणखी एका महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे डॉ. दिघे यांनी स्पष्ट केले. वंध्यत्वाच्या सुमारे निम्म्या प्रकरणांमध्ये पुरुष घटकही कारणीभूत असू शकतो. मात्र, गर्भधारणा होत नसल्यास तपासणीची सुरुवात प्रामुख्याने महिलांपासून केली जाते. वंध्यत्वाच्या समस्येकडे केवळ महिलेची समस्या म्हणून न पाहता दोन्ही जोडीदारांनी एकत्रित तपासणी करून घेणे आवश्यक आहे. पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या कमी असणे, त्यांची गुणवत्ता किंवा हालचाल कमी असणे यांसारख्या समस्या प्रजननक्षमतेवर परिणाम करू शकतात. धूमपान, मद्यपान. लठ्ठपणा, ताणतणाव, अपुरी झोप, मधुमेह, हार्मोनल समस्या तसेच काही वैद्यकीय कारणांचाही पुरुषांच्या प्रजननक्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

जलसंकटाच्या आव्हानाची चित्रांतून अभिव्यक्ती; विद्यार्थ्यांचा सहभाग

वनराईच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत चित्रकला उपक्रम; १५० हून अधिक विद्यार्थी, ५० शिक्षक व पालकांची उपस्थिती

■ पुणे(दै. संध्या)

भारतभूमी सुजलाम-सुफलाम व्हावी, हे स्वप्न पाहणारे पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी वनराईच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत आयोजित चित्रकला उपक्रमात पुण्यातील ५० हून अधिक शाळांमधील १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. छत्रपती संभाजी महाराज उद्यान, बालगंधर्व, पुणे येथे बुधवारी झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी जलसंकट आणि दुष्काळाच्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाची गरज आपल्या चित्रांतून मांडली. यावेळी सुमारे ५० शिक्षक व पालकही उपस्थित होते.

डॉ. मोहन धारिया यांनी वनराईच्या माध्यमातून भारतभूमी सुजलाम-सुफलाम करण्याचे स्वप्न पाहिले होते. त्यांच्या स्मृतींना उजाळा देतानाच विद्यार्थ्यांमध्ये आजच्या पर्यावरणीय प्रश्नांविषयी जाणीव निर्माण



करणे आणि चित्रकलेसारख्या सर्जनशील माध्यमातून त्यांना विचार करण्यास प्रवृत्त करणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वनराईचे सचिव मा. अमित वाडेकर यांनी केले. दुष्काळ आणि जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर वनराईच्या पर्यावरण संवर्धन कार्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. जलसंवर्धन, निसर्गाचे संरक्षण आणि पर्यावरणपूरक जीवनशैली यांविषयी समाजात जाणीव निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी संवेदनशीलता निर्माण होऊन त्यांना कृतीसाठी प्रेरणा मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कलाकार मा. रमाकांत धानोकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. चित्रकला हे विचार, भावना आणि सभोवतालच्या परिस्थितीविषयीची निरीक्षणे व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. कल्पनाशक्तीचा वापर करून पर्यावरणासारख्या महत्त्वाच्या विषयांवर चित्रांतून भाष्य कसे करता येते, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुण्यातील अवकाश आर्ट गॅलरीशी संबंधित असलेल्या धानोकर यांच्या संवादातून विद्यार्थ्यांना चित्रकलेच्या अभिव्यक्तीविषयी नवा दृष्टिकोन मिळाला. वनराईचे विश्वस्त मा. सागर धारिया यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना 'जलसंकट आणि आपण', 'जल हेच जीवन', 'आमची शाळा : हरित शाळा' आणि 'माझ्या परिसरातील जैवविविधता' हे चार विषय देण्यात आले होते. पाण्याचे महत्त्व, जलसंकटावरील संभाव्य उपाय, शाळेतील पर्यावरणपूरक उपक्रम आणि परिसरातील जैवविविधतेचे संवर्धन अशा विविध मुद्द्यांना विद्यार्थ्यांनी आपल्या चित्रांतून स्पर्श केला. चित्रकलेसाठी आवश्यक कागद, रंग, पेन्सिली, खोडरबर आणि शार्पनर विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले. वनराईचे पर्यावरण शिक्षण कार्यक्रम समन्वयक बसवंत विठाबाई बाबाराव यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागातून लोकजागृती घडवून आणण्याच्या महत्त्वावर भर दिला. भारतभूमी सुजलाम-सुफलाम करण्याचे डॉ. मोहन धारिया यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आजच्या पिढीवरही आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या चित्रांमधून पर्यावरणविषयक संदेश मित्रांपर्यंत, कुटुंबापर्यंत आणि समाजापर्यंत पोहोचवावा.

थोडक्यात पण महत्वाचे



हिंदू समाजात एकजूट निर्माण झाली पाहिजे

पुणे : दैनिक संध्या

आजची परिस्थिती बदलायची असेल, तर हिंदू समाजात एकजूट निर्माण झाली पाहिजे. हिंदू धर्म ज्ञान आणि अध्यात्माच्या दृष्टीने सामर्थ्यशाली आहे. मात्र, अनेक ठिकाणी लव्ह जिहादच्या घटना घडत असून धर्मांतराच्या माध्यमातून धर्मावर आक्रमण होत असल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे लोकांनी सर्व हिंदू समभावाचे आचरण करावे, असे मत समस्त हिंदू आघाडीचे कार्याध्यक्ष मिलिंद एकबोटे यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त समस्त हिंदू आघाडी पुणे शहराच्या वतीने सोमवार पेठेतील श्री गाडगेबाबा धर्मशाळेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे यंदा १९ वे वर्ष होते. राष्ट्रसंत पूजनीय गाडगेबाबा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना यावेळी अभिवादन करण्यात आले. यावेळी हिंदू धर्म जागरणाचे काम करणाऱ्या युवक आणि महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्राध्यापक अनिल भोसले, विकी ढोले उपस्थित होते. मिलिंद एकबोटे म्हणाले, भारतात भेदभाव निर्मूलनासाठी ठोस प्रयत्न झाले पाहिजेत. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्याची मुहूर्तमेढ आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक आणि लहुजी वस्ताद साळवे यांनी रोवली. ज्या समाजाच्या उन्नतीचे स्वप्न आपण पाहतो, तो समाज सुप्त सामर्थ्याने संपन्न आहे. प्राध्यापक अनिल भोसले, सामाजिक कार्यकर्ते शिवम सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. विकी ढोले यांनी सूत्रसंचालन केले.



आयुष्यमान भारत कार्ड शिबिराला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद,.

चाकण : दैनिक संध्या

सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ मिळावा, या उद्देशाने चाकण झिन्राईमळा येथे आयोजित करण्यात आलेल्या आयुष्मान भारत कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. चाकण पतसंस्थेचे माजी अध्यक्ष प्रकाश भुजबळ व शिवसेनेचे चाकण शहर उपप्रमुख चेतन सोनवणे यांच्या पुढाकाराने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिवसेनेचे पुणे जिल्हाप्रमुख रामदास धनवटे व चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या हस्ते नोंदणी शिबिर व आरोग्य शिबिराचे उद्घाटन झाले. या शिबिरात नागरिकांना आयुष्मान भारत योजनेचे फायदे व कार्ड नोंदणीबाबत तज्ञांनी मार्गदर्शन केले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तब्बल तीनशे नागरिकांना आयुष्यमान कार्ड काढुन देण्यात आले. तर ६०० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. जनसाहस फाउंडेशन व संजीवनी हॉस्पिटल यांचे या शिबिरासाठी विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास धनवटे, नगराध्यक्षा मनीषा गोरे, उपनगराध्यक्ष जयश्री नायकवाडी, पूनम शेवकरी, तालुका प्रमुख किरण गवारी, शहरप्रमुख नितीन वाव्हळ, किसन गोरे, शेखर पिंगळे, स्वामी पिंगळे, पांडुरंग गोरे, दत्ता शिंगाडे, प्रदीप आगरकर, रोनक गोरे, सुनिल शेवकरी, निलेश शेवकरी, आशिष शेवकरी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रकाश भुजबळ यांनी सर्वांचे आभार मानले.

ॲड. निकम यांच्या 'न्याय विश्वास फाउंडेशन'ची 5000 पेक्षा जास्त ग्रामीण नागरिकांना मदत

जळगाव : दैनिक संध्या

बॉलिवूड चित्रपट प्रहार: द अनटोल्ड स्टोरी ऑफ उज्ज्वल निकम यामुळे भारतातील सर्वात प्रतिष्ठित कायदेशीर कुटुंबांपैकी एका कुटुंबाची चर्चा राष्ट्रीय स्तरावर होत असताना, ॲड. अनिकेत उज्ज्वल निकम आपल्या न्याय विश्वास फाउंडेशन या तळागाळातील उपक्रमाच्या माध्यमातून न्यायालयाबाहेरही महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. 5 हून अधिक कायदेशीर मदत शिबिरांचे आयोजन आणि ग्रामीण महाराष्ट्रातील 5000 हून अधिक नागरिकांपर्यंत पोहोच साधत, हे फाउंडेशन सामान्य नागरिक आणि न्याय मिळवण्याची प्रक्रिया यांच्यातील दरी कमी करण्यासाठी कार्यरत आहे. प्रहार: द अनटोल्ड स्टोरी ऑफ उज्ज्वल निकम या आगामी चित्रपटाच्या घोषणेनंतर ॲड. अनिकेत निकम यांच्याकडेही लक्ष वेधले गेले आहे. हा हिंदी चरित्रात्मक न्यायालयीन नाट्यपट असून, यामध्ये प्रसिद्ध अभिनेता राजकुमार राव हे नामांकित सरकारी अभियोक्ता उज्ज्वल निकम यांची भूमिका साकारत आहेत. अविनाश अरुण यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणारा हा चित्रपट उज्ज्वल निकम यांच्या उल्लेखनीय कायदेशीर प्रवासावर प्रकाश टाकतो. यामध्ये 26/11 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यांनंतर अजमल कसाबविरुद्ध चालवण्यात आलेल्या खटल्यातील त्यांच्या भूमिकेचाही समावेश आहे. विशेष म्हणजे, दंगल आणि फ्लेम्स या चित्रपट व मालिकांमधील अभिनयासाठी ओळखले जाणारे अभिनेता ऋत्विक साहोरे या चित्रपटात ॲड. अनिकेत निकम यांची भूमिका साकारत आहेत.

तीन महिन्यांच्या बाळासह एकाच कुटुंबातील ६ जणांचा अंत, ट्रकची भीषण धडक

जळगाव : दैनिक संध्या

भरधाव ट्रकने समोरून येणाऱ्या दुचाकीला जबर धडक दिली. यात एकाच कुटुंबातील तीन महिन्याच्या बाळासह सहा जण ठार झाले. हे सर्व जण एकाच दुचाकीने प्रवास करीत होते. ही भीषण घटना जामनेर-बोदवड रोडवर मालदाभाडीनजीक गुरुवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी ट्रकचालकास ताब्यात घेण्यात आले आहे. मृत सर्व मालची तांडा, बऱ्हाणपूर (मध्य प्रदेश) येथील रहिवासी होते. मृतांमध्ये रामा सुरशिंग भिलाले (२६), त्याची पत्नी सिमला रामा भिलाले (२२), शालक चंपालाल रेवनसिंग भिलाले (२८), पूजा रामा भिलाले (५), भारती रामा भिलाले (३ वर्षे) आणि श्रावण रामा भिलाले (३ महिने) यांचा समावेश आहे.

धर्म आणि विज्ञानाचा समन्वय साधणारे संशोधक राष्ट्रपती म्हणजे डॉ. कलाम

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांचे मत; डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९५व्या जयंतीनिमित्त विजय चव्हाण यांच्या 'डॉ. कलाम स्मृतीगंध' आणि 'कलाम यांच्या कविता : भावानुवाद' या ग्रंथांचे प्रकाशन

■ पुणे (दै. संध्या)

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे धार्मिक कर्मकांड मानणारे नव्हते, मात्र धर्मवादी विचारांचे होते. धर्म आणि विज्ञान यांचा समन्वय साधणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. जगात पहिल्यांदाच देशाला संशोधक राष्ट्रपती लाभले. राष्ट्रपतीपदावर असतानाही त्यांनी विद्यार्थी, युवक, शेतकरी आणि सैनिकांशी थेट संवाद साधला. सूर्याप्रमाणे आपल्या कार्यासाठी सदैव तळपत राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. कलाम, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९५व्या जयंतीनिमित्त विजय चव्हाण संपादित 'डॉ. कलाम स्मृतीगंध' आणि 'कलाम यांच्या कविता : भावानुवाद' या ग्रंथांचे प्रकाशन शुक्रवार पेठेतील जिजामाता हायस्कूल येथे करण्यात आले. यावेळी डीआरडीओ, पुणेचे उपसंचालक डॉ. के. आर. सिवन, नासा स्पेस एज्युकेटर लीना बोकील, अभियंता कमलकांत वडेलकर, लेखक विजय चव्हाण, हम्सा यलगुर, वीर शिवराय मंडळाचे किरण सोनिवाल, अनिकेत यादव, निलेश वरघन्टे, प्राचार्य संगीता खताळ, प्रशालेच्या मुख्याध्यापिका मनीषा पाटील, शिक्षिका मनीषा चव्हाण, उज्ज्वला चव्हाण, शुभांगी पाटील सोनाली धोंडे, सुषमा तांबे, सतीश चव्हाण, अक्षय पानसरे, शिवाजी भंडारे, आतिश चव्हाण उपस्थित होते.

डॉ. के. आर. सिवन म्हणाले, डॉ. कलाम यांच्या सहवासात असताना कामाव्यतिरिक्त जेव्हा वेळ मिळत असे, तेव्हा ते जगाने पुढे कसे जावे आणि गरजू व्यक्तींना कशी मदत करता येईल, याचाच विचार करत असत. विश्वकल्याणाचा विचार करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे विचार आजही संपूर्ण जगाला प्रेरणा देणारे आहेत.



विद्यार्थ्यांनी नेहमी कष्ट केले पाहिजेत आणि आपल्या कष्टांवर विश्वास ठेवला पाहिजे. स्वतःची तुलना इतरांशी करण्याऐवजी स्वतःच्या क्षमता ओळखल्या पाहिजेत. एखादे क्षेत्र निवडल्यानंतर केवळ त्यापुरते मर्यादित न राहता स्वतःच्या क्षमता आणि आवडींचा अधिकाधिक शोध घेत, स्वतःच्या क्षमता आणि कौशल्यांचा अधिकाधिक विकास केला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

विजय चव्हाण म्हणाले, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या विचारांतून आणि कार्यातून देशातील असंख्य युवकांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम करण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या साधेपणातून, ज्ञानातून आणि राष्ट्रनिर्माणाच्या ध्यासातून आजच्या पिढीने प्रेरणा घेतली पाहिजे. युवकांनी स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून देशाच्या विकासात योगदान द्यावे, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. युवकांना डॉ. कलाम यांच्या विचारांतून प्रेरणा मिळावी, या उद्देशाने मी त्यांच्या विचारांचा संदेश पुस्तकांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवत आहे. लीना बोकील यांनी देखील मार्गदर्शन केले.

जेजुरीतील कडेपठारच्या डोंगरात किर्लोस्कर फेरस कंपनीतर्फे ३५०० वृक्षांची लागवड

■ जेजुरी : (दै. संध्या)

श्रीक्षेत्र जेजुरी येथील खंडोबाचे मूळ स्थान म्हणून ओळखले जाणाऱ्या कडेपठारच्या डोंगरात आज जेजुरीतील किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज कंपनीतर्फे ३५०० विविध प्रकारच्या देशी वृक्षांची लागवड, संवर्धन व ठिबक सिंचन योजनेचा शुभारंभ झाला.

यावेळी कंपनीचे सरव्यवस्थापक पी सत्यमूर्ती, कार्यकारी प्रमुख श्रीनिवास राव, मनुष्यबळ विकास प्रमुख झाकीर शेख, प्रमोद दोडे, उज्वल कुलकर्णी, संदीप शहा, प्रसाद बल्लाळ, प्रवीण पवार, जब्बार पठाण, संदीप घोणे, सुरज भोईटे, अनिल खाडे, वन खात्याच्या दिपाली शिंदे, धनंजय देवकर, अनिल खाडे, मंगेश जेजुरीकर, देवस्थानचे विश्वस्त मयूर दीडभाई, ऋषिकेश सातभाई, सदानंद बारभाई आदी उपस्थित होते. नाझरे (क.प) मधील नागेश्वर विद्यालयाचे ६० विद्यार्थी व शिक्षक यावेळी श्रमदानात सहभागी झाले होते. डोंगरामध्ये गेल्या तीन महिन्यापासून श्री खंडोबा देवता लिंग कडेपठार ट्रस्टच्या वतीने कडेपठार घनवन प्रकल्प राबविण्यात येत आहे. यात प्रामुख्याने लिंब, बहावा, कदंब, गुलमोहर, अशोक, आवळा, जांभूळ, वड, पिंपळ, पळस अशा पद्धतीच्या झाडांचा समावेश आहे. अनेक झाडांना ठिबक सिंचन करून कायमस्वरूपी पाणी दिले जाणार आहे. कडेपठारच्या मुख्य मंदिराच्या परिसरात देवराई तयार करण्यात आली आहे. वृक्ष लागवड मोहिमेचे उद्घाटन करताना झाकीर शेख यांनी कडेपठार हे ठिकाण राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. येथे मोठ्या प्रमाणात वनराई फुलल्यावर त्याचा भाविकांना आनंद घेता येईल, देवावरील श्रद्धा व पर्यावरणाचे रक्षण या उद्देशाने सुरू झालेल्या या प्रकल्पाला कंपनीच्यावतीने सर्वतोपरी मदत करू असे सांगितले . वन खात्याच्या सहकार्याने कडेपठार पायऱ्याच्या दुतर्फा व कडेपठार डोंगर ते खंडोबा मंदिर या रस्त्यावर आता मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड सुरू झाल्याने भविष्यात लवकरच सारा परिसर हिरवाईने नटला जाईल.



जळगाव जिल्हा बँक निवडणूक: ३,०७४ मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध

■ जळगाव : (दै. संध्या)

जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी ३,०७४ मतदारांची अंतिम यादी १४ ऑक्टोबर रोजी ऑनलाईन जाहीर झाली. नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या या निवडणुकीसाठी जिल्हा सहकार निवडणूक अधिकारी संभाजी निकम यांनी प्रारूप यादीवरील सुनावणीनंतर ही अंतिम यादी प्रसिद्ध केली. संस्था सभासदांच्या २,५७१ मतदारांत सर्वाधिक ४३१ मतदार रावेर तालुक्यात, तर सर्वात कमी ५५ मतदार मुक्ताईनगरमध्ये आहेत.

वैयक्तिक सभासदांच्या ४७४ मतदारांत सर्वाधिक १८३ मतदार यावलमध्ये, तर मुक्ताईनगर व एरंडोलमध्ये प्रत्येकी केवळ २ मतदार आहेत. सुधारित यादीत संस्था गटातून ९ नावे वगळून ३ नवी नावे जोडली, तर दोन्ही गटांत मिळून एकूण ९ नवीन समाविष्ट झाले आहेत.

दरम्यान, जिल्हा बँकेत सलग दहा वर्षे संचालक राहिलेल्या व्यक्तीला पुन्हा निवडणूक लढवता येणार नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने दिल्याने जळगावमधील दिग्गजांच्या राजकीय भविष्याबाबत चर्चांना उधाण आले आहे.



उषाची 'ब्लूम सिरीज' नव्या रूपात; निसर्गप्रेरित सहा आकर्षक पंखे बाजारात

■ नवी दिल्ली : (दै. संध्या)

■ अत्याधुनिक बीएलडीसी तंत्रज्ञानासह ऊर्जा बचत, शांत कार्यप्रणाली आणि आकर्षक रचनांचा संगम; किंमत ७,१५२ रुपयांपासून

भारतातील आघाडीच्या ग्राहक टिकाऊ वस्तू उत्पादक ब्रँडपैकी एक असलेल्या उषा इंटरनॅशनलने आपल्या प्रीमियम पंख्यांच्या श्रेणीला नवे रूप देत 'उषा ब्लूम सिरीज'मधील सहा आकर्षक रचनांचे पंखे सादर केले आहेत. निसर्ग आणि फुलांच्या सौंदर्यापासून प्रेरणा घेत तयार करण्यात आलेल्या या पंख्यांमध्ये आधुनिक रचना, ऊर्जा-कार्यक्षमता आणि आरामदायी वापर यांचा संगम साधण्यात आला आहे. या नव्या श्रेणीमध्ये उषा ब्लूम सनस्पायर ग्लो, उषा ब्लूम लिली ग्लो, उषा ब्लूम लिली नोव्हा, उषा ब्लूम डालिया, उषा ब्लूम प्लुमेरिया आणि उषा ब्लूम हेलेनियम या सहा प्रकारांचा समावेश आहे. आधुनिक घरांच्या अंतर्गत सजावटीला अनुरूप असलेल्या या पंख्यांमध्ये प्रगत बीएलडीसी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या तंत्रज्ञानामुळे हे पंखे केवळ ३४ वॅट वीज वापरून शांतपणे आणि ऊर्जा-कार्यक्षम पद्धतीने कार्य करतात. मॉडेलनुसार, हे पंखे प्रति मिनिट ३५० फेऱ्यांपर्यंत वेगाने फिरू शकतात आणि प्रति मिनिट २२५ घनमीटरपर्यंत हवा खेळती ठेवण्याची क्षमता त्यांच्यात आहे. दैनंदिन वापरातील सोयी लक्षात घेऊन या श्रेणीत धूळ आणि ओरखड्यांना प्रतिरोधक पाती, कोणत्याही दिशेने वापरता येणारे रेडिओ फ्रिक्वेन्सी रिमोट, स्मार्ट टॉगल रिकव्हरी आणि सुरक्षिततेसाठी सेफ्टी वायर यांसारखी वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. निवडक प्रकारांमध्ये बूस्ट मोड आणि स्लीप किंवा टाइमरची सुविधाही उपलब्ध आहे.

अडीच लाखांत लग्न करुन आणले अन्; तिसऱ्याच दिवशी नवविवाहितेचा संपूर्ण कुटुंबाला संपवण्याचा कट

■ जेजुरी : (दै. संध्या)



जळगाव जिल्ह्यातून अत्यंत खळबळजनक प्रकार समोर आला आहे. लग्नाच्या अवघ्या ७२ तासांतच एका नवविवाहितेने पतीसह सासरच्या सर्व मंडळींना जेवणात उंदीर मारण्याचे विष मिसळून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून, विषबाधा झालेल्या सर्व कुटुंबियांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

हा सगळा प्रकार जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील वेल्हाणे गावात घडला. ७ ऑक्टोबर रोजी येथील ३२ वर्षीय तरुणाचा विवाह झाला होता. विवाहाच्या अवघ्या दोन दिवसानंतर नववधून रात्रीच्या जेवणात उंदीर मारण्याचे औषध मिसळले. हे जेवण खाल्ल्यानंतर काही वेळातच पती आणि इतर तीन कुटुंबीयांची प्रकृती बिघडवू लागली. सर्वांना तातडीने धुळे येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारांनंतर सध्या सर्वांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे.

जेवणानंतर कुटुंबाची तब्येत बिघडल्याचे लक्षात येताच हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. संधी साधून ती नवविवाहिता आपल्या एका महिला साथीदारासह घरातले सोन्याचे दागिने आणि लग्नात मिळालेली रोकड घेऊन तिथून पसार झाली. या घटनेमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी आणि नातेवाईकांनी दोन्ही आरोपी महिलांना तात्काळ अटक करावी, या मागणीसाठी पोलीस ठाण्यासमोर रस्ता रोको आंदोलन केले. पोलिसांनी तातडीने तपास करत धुळे जिल्ह्यातील निमगुल गावाजवळून पळून जाणाऱ्या दोन्ही महिलांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान समोर आले की, आरोपी नववधू आणि तिची साथ देणारी महिला झारखंड राज्यातील आहेत. या महिलांचे नाव सुमन सुभाष साहनी आणि आरती सूर्याक्ष पटेल असे आहे. जळगावमधील पारोळा परिसरातील या तरुणाचे लग्न जुळत नसल्याने, अडीच लाख रुपये देऊन दुसऱ्या राज्यातील मुलीशी त्याचा विवाह लावून आणण्यात आला होता.

गुंफा निवासी, सह्याद्री डोंगरवासी-बोलाईदेवी, महाराष्ट्राची प्रति वैष्णोदेवी, कित्येक शतके गुहेत वास्तव्य

■ पुरंदर (दै. संध्या)

सह्याद्री आणि पुरंदरच्या डोंगररांगांना धार्मिक आणि पौराणिक इतिहास लाभला आहे. या भौगोलिक डोंगररांगातून नेहमीच देव-देवींचा नामगजर होत असतो.

खंडोबाच्या जेजुरी नगरीपासून जवळच, गुळुंचे ज्योतिर्लिंग परिसरातील उंच डोंगरमाथ्यावर, डोंगराच्या भूगर्भात एका विशाल गुंफेत कित्येक शतके विराजमान असलेली आणि नवसाला पावणारी म्हणजे बोलाई आई!

काश्मीरच्या गुहेतील वैष्णोदेवी प्रमाणेच, महाराष्ट्राची गुहेतील बोलाई माता म्हणून तिची ओळख आहे. नितांत सुंदर, निसर्गरम्य परिसरात उंच डोंगरमाथ्यावर तिचे देऊळ गुहेच्या स्वरूपात दिसते. नवरात्र उत्सवात नऊ दिवस आईचा जागर, गोंधळ, जोगवा, भजन-कीर्तन आणि धार्मिक विधी हजारो भक्तांच्या उपस्थितीत होत असतात. पुणे-पंढरपूर पालखी मार्गावरून जाताना वाल्हे आणि थोपटेवाडी येथून या ठिकाणी जाता येते. दुरूनच आईचा डोंगर आणि त्यावर फडकणारी भव्य पताका दिसताच भाविकांच्या तोंडून "बोल आईचा उदो उदो" चा गजर होतो. उंच डोंगराच्या नागमोडी वाटेने गुहेकडे रस्ता जातो. साधारण पायऱ्या चढल्या की ओबडधोबड दगडांच्या गुहेत प्रवेश होतो. आत जाताच देवीच्या दगडी पुरातन मूर्ती आढळतात. येथील उपासक आणि गुरव पुजारी गणेश शिंदे धार्मिक विधीपूर्वक पूजा-अर्चा करत असतात. फार पूर्वी या गुहेतून आपोआप भांडी निघत असत. भाविक त्यात अन्न-नैवेद्य बनवून प्रसादाचे वाटप करत असल्याची ऐतिहासिक माहिती श्री. शिंदे यांनी दिली. पूर्वी रस्ता आणि लाईटची व्यवस्था नव्हती. झाडीतून वाट काढत गुळुंचे, सुकलवाडी, कर्नलवाडीचे भक्त आणि गुरव पुजारी पूजेला येत असत. देवीला सतत तेलाचा दिवा तेवत ठेवला जातो, तो आजही तेवत आहे. फार पूर्वी ऊन, वारा, पावसापासून संरक्षणासाठी मेंढपाळ, धनगर, ग्रामस्थ या गुहेचा आसरा घेत असत. त्यावेळी देवीने साक्षात्कार दिल्याचे सांगितले जाते. या मूळ स्थानावरूनच देवी वाडेबोलाई या ठिकाणीही गेली असे बोलले जाते. सध्या रस्ता, पाणी, लाईट या सुविधा भाविकांच्या देणगीतून विस्तारित होत असून, भाजपचे कार्यकर्ते संजय निगडे यांनी सांगितल्याप्रमाणे येथे लाईटची व्यवस्था करण्यात आली आहे.या स्थळाचा महात्म्य आणि परिसर निसर्ग-पर्यटन दृष्ट्या विकसित होणे गरजेचे असून, उत्तम सोय-सुविधा, भक्तनिवास, अन्नछत्र आणि बस व्यवस्था होण्यासाठी संबंधित मंत्र्यांकडे साकडे घालणार असल्याचे देवीच्या दर्शनासाठी आलेले जेजुरी देवस्थानचे मानकरी आणि शहर मंडल अध्यक्ष श्री. सचिन पेशवे यांनी सांगितले.





पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाय... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



माजी राष्ट्रपती,भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

पिंपरी : दैनिक संध्या

भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे भारतरत्न दिवंगत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये झालेल्या कार्यक्रमास महापौर रवि लांडगे,उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर,उपायुक्त आण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते विशाल जाधव उपस्थित होते. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मितीच्या क्षेत्रात माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाचे यावेळी स्मरण करण्यात आले. आपल्या कार्यातून देशाला नवी दिशा देणाऱ्या थोर शास्त्रज्ञ डॉ. कलाम यांचे विचार आजही तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

दसरा मेळाव्याला पश्चिम महाराष्ट्रातून ११ हजार भाविक जाणार : सदाशिव खाडे

पिंपरी,: दैनिक संध्या



लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी गेल्या तीस वर्षापासून दसरा मेळाव्याच्या माध्यमातून बहुजन, वंचित आणि ऊसतोड कामगारांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे समाज उपयोगी कार्य केले आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी बहुजन, वंचित आणि शोषित घटकांचा आवाज बुलंद करण्याची परंपरा यशस्वीपणे पुढे सुरू ठेवली आहे. अन्यायग्रस्त वंचित व कष्टकरी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी दसरा मेळाव्याच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. यंदाचा दसरा मेळावा मंगळवारी (दि. २० ऑक्टोबर) लाखोंच्या संख्येने थोर संत राष्ट्रसंत भगवान बाबा यांची जन्मभूमी असलेल्या बीड जिल्ह्यातील सावरगाव घाट, तालुका पाटोदा येथे मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली साजरा होणार आहे. या मेळाव्यास महाराष्ट्र सह राजस्थान, तेलंगणा, गुजरात, मध्य प्रदेश व इतर राज्यातून राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे भक्त आणि लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे अनुयायी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यास पश्चिम महाराष्ट्रातून पिंपरी चिंचवड, पुणे शहरासह अकरा हजार अनुयायी उपस्थित राहणार असल्याची माहिती मेळाव्याचे समन्वयक व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांनी प्रसिद्धीस दिली आहे. या मेळाव्याची नियोजन बैठक पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी भगवान सेना प्रदेश पदाधिकारी पंचायत समिती सदस्य अशोक मुंडे, नगरसेवक अपूर्व खाडे, योगिता नागरगोजे, माजी उपमहापौर केशव घोळवे तसेच प्रा. रवी खेडकर, सुनील बांगर, दीपक नागरगोजे, अनंत कांदे, पवन जाधवर, डॉ. ज्ञानोबा मुंडे, कैलास केकाने, गणेश ढाकणे, कैलास सानप, भागवत मुंडे, रघुनंदन घुले, एस. नाकाडे, राहुल खाडे, राहुल नागरगोजे, रामदास कावळे, संजय बढे, डॉ. महेश गर्जे, बबन गर्जे, नामदेव सारुक, अण्णा गर्जे आदी उपस्थित होते. "बैसोनी पाण्यावरी वाचली ज्ञानेश्वरी" या संदर्भाचा उल्लेख विविध ग्रंथांमध्ये आढळतो. राष्ट्रसंत भगवान बाबांनी पाण्यावर बसून ज्ञानेश्वरी वाचल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहे. या थोर संतांचे त्यांच्या जन्मभूमी सावरगाव घाट, तालुका पाटोदा येथे भव्य दिव्य स्मारक उभारण्यात आले आहे हे स्मारक भगवान बाबांच्या महान कार्याची, विचारांची आणि समाज प्रबोधनाच्या परंपरेची आठवण करून देणारे प्रेरणास्थान आहे. राष्ट्रसंत भगवान बाबा हे महान समाज प्रबोधनकार आणि युगपुरुष होते. समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा आणि जातीभेद यांचे विरुद्ध त्यांनी आपल्या कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून समाज जनजागृतीचे कार्य केले अशा महान राष्ट्रसंत भगवान बाबा यांना अभिवादन करण्यासाठी दसरा मेळाव्यात अभिवादन करण्यासाठी दसरा मेळाव्यात उपस्थित रहावे असे आवाहन सदाशिव खाडे यांनी केले आहे.

ग्रंथांचा आधार घेऊन कौशल्य सिद्ध करा, ग्रंथ विश्वासार्हता देतात : प्रा. डॉ. मीनल ओक

पिंपरी: दैनिक संध्या



सध्याचा काळ हा कौशल्य प्राप्त असणाऱ्या व्यक्तींचा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लेखन, वाचन, संवाद कौशल्य विकसित करून गुणवत्ता वाढवली पाहिजे. एमबीए आणि पीएचडी सारखे उच्च शिक्षण घेत असताना तुमची क्षमता सिद्ध करावी लागते. यासाठी पूर्णता एआय किंवा गुगल वर अवलंबून राहू नये, तर ग्रंथालयात जाऊन संदर्भ ग्रंथांचा आधार घेऊन आपले कौशल्य सिद्ध करा, ग्रंथ तुम्हाला विश्वासार्हता देतात त्यामुळे शब्दसंग्रह समृद्ध होतो. संवाद साधताना तांत्रिक भाषा किंवा पारिभाषिक शब्दांचा वापर करून आत्मविश्वासाने सादरीकरण करता येते. नेहमी स्वतः मूळ लेखन करावे. संदर्भांसाठी एआय आणि ॲप्स चा वापर सहाय्यक म्हणून करता येईल, परंतु त्यातील मजकूर कॉपी पेस्ट करू नये. कारण ते वाङ्मयचौर्य आहे असे मार्गदर्शन आयएमसीसी च्या प्रा. डॉ. मीनल ओक यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे वाचन प्रेरणा दिवस निमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानात डॉ. ओक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी माजी राष्ट्रपती ए. पी. जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात ग्रंथ वाचन करीत त्यांना अभिवादन केले.

वायसीएमच्या शवविच्छेदन विभागात दारू पार्टी

पिंपरी: दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या (वायसीएम) शवविच्छेदन विभागात दारू पार्टी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकाराचा व्हिडीओ समोर आल्याने रुग्णालयाच्या कामकाजावर आणि संबंधित विभागातील शिस्तीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शवविच्छेदनासारख्या अतिसंवेदनशील विभागात टेबलवर दारूची बाटली, भरलेले पेग, खाण्याचे पदार्थ आणि जेवणाची ताटे दिसत असल्याचा दावा व्हिडीओच्या आधारे केला जात आहे. मृतदेहांचे शवविच्छेदन केले जाणाऱ्या ठिकाणी असा प्रकार घडल्याचा आरोप झाल्याने या प्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत्यूचा दाखला मिळवण्यासाठी आलेल्या एका व्यक्तीला रात्रभर थांबूनही दाखला मिळाला नव्हता. दाखला मिळण्यास विलंब का होत आहे, हे पाहण्यासाठी संबंधित व्यक्ती विभागात गेल्यानंतर या पार्टीचा प्रकार समोर आल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, या घटनेचा नेमका घटनाक्रम आणि संबंधित बाबींची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे.

बिल्डरांच्या फायद्यासाठी पुरेसा कमी करण्यासाठी पाडलेला बंधारा पुन्हा बांधा

■ पिंपरी : (दै. संध्या)

पिंपरी मिलिटरी डेअरी फार्म आणि पिंपळे सौदागर परिसरातील पवना नदीवर पूर्वी अस्तित्वात असलेला बंधारा जो बिल्डरांच्या फायद्यासाठी पुरेसा कमी करण्यासाठी पाडला होता तो बंधारा पुन्हा बांधण्यात यावा, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते अमोल उबाळे यांनी केली आहे. यासंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले असून, काही वर्षांपूर्वी पाडण्यात आलेल्या या बंधाऱ्यामुळे परिसराची झालेली दयनीय अवस्था आणि पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पत्रात म्हटले आहे की, काही वर्षांपूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मच्छरांच्या उपद्रवाचे कारण पुढे करत, हा बंधारा पाडण्यासाठी डेअरी फार्म प्रशासनाला निधी उपलब्ध करून दिला होता. त्यानंतर हा बंधारा पाडण्यात आला. मात्र, तेव्हापासून नदीपात्रात पाणी साठणे बंद झाल्याने या महत्त्वपूर्ण जलस्रोताची अवस्था अत्यंत दयनीय व एका गटारासारखी झाली आहे.


हा बंधारा उभा असताना पिंपरीगाव, पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी, थेरगाव आणि चिंचवड या संपूर्ण परिसरातील पवना नदी वर्षभर पाण्याने भरलेली असायची.

डेअरी फार्ममधील गायी-म्हशींसह परिसरातील जनावरांना या पाण्याचा मोठा आधार होता. तसेच, भूजलाच्या उच्च पातळीमुळे आजूबाजूच्या गावातील विहिरी आणि बोअरवेलना वर्षभर पाणी असायचे. परंतु, बंधारा नष्ट केल्यापासून भूजल पातळी वेगाने खालावली असून नदीपात्रात केवळ दुर्गंधीयुक्त सांडपाणी वाहत असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सध्या काही स्वार्थी बांधकाम व्यावसायिक पूरेषा मर्यादित ठेवण्याच्या कारणावरून या बंधाऱ्याच्या पुनर्बाधणीला अप्रत्यक्ष विरोध करत आहेत.

मोजक्या बिल्डरांच्या व्यावसायिक फायद्यासाठी आणि दबावामुळे या महत्त्वाच्या सार्वजनिक कामाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप उबाळे यांनी केला आहे.

जनहित आणि पर्यावरण रक्षणाला प्राधान्य देऊन प्रशासनाने कोणत्याही दबावाखाली न येता, पिंपरी डेअरी फार्म व पिंपळे सौदागर येथील पाडलेल्या बंधाऱ्याची त्वरित पुनर्बाधणी करावी, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते अमोल उबाळे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ विजय सुर्यवंशी यांच्याकडे केली आहे.



भक्ती आणि शक्तीचा संगम; पैलवान सवंगड्यांच्या भेटीने आमदार महेश लांडगे भावुक!

■ पिंपरी (दै. संध्या)

आखाड्यातील मेहनत, वस्तादांनी दिलेले संस्कार आणि मातीशी जुळलेले नाते जपणारे आमदार महेश लांडगे यांच्यासाठी नवरात्रोत्सवाची चौथी माळ विशेष ठरली. आई अंबाबाईच्या महाआरतीनिमित्त शहरातील ज्येष्ठ मल्ल, मार्गदर्शक वस्ताद आणि पुण्यातील गुलशे तालमीतील पैलवान सवंगडी एकत्र आले. त्यांच्या भेटीने आमदार लांडगे यांच्या कुस्तीच्या प्रवासातील आठवणींना उजाळा मिळाला.

पै. महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि शिवांजली सखी मंच यांच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात चौथ्या माळेनिमित्त महाआरतीचा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी कुस्ती क्षेत्रातील मंडळींनी उपस्थित राहून देवीचे



दर्शन घेतले. शक्तीची साधना करणाऱ्या पैलवानांच्या देवीभक्तीमुळे सोहळ्यात भक्ती आणि शक्तीचा संगम अनुभवायला मिळाला.

आमदार महेश लांडगे स्वतः पैलवान असल्याने कुस्तीपट्टू, वस्ताद आणि कुस्ती क्षेत्राशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. पुण्यातील गुलशे तालमीत त्यांनी कुस्तीचे धडे गिरवले. याच तालमीतील मित्र आणि मार्गदर्शक महाआरतीसाठी आल्याने आखाड्यातील सराव, मेहनतीचे दिवस आणि वस्तादांच्या मार्गदर्शनाच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या. सार्वजनिक जीवनातील जबाबदाऱ्या सांभाळतानाही तालमीतील सवंगड्यांप्रती त्यांची आपुलकी या भेटीतून अधोरेखित झाली.

पैलवानांसाठी कुस्ती ही केवळ शारीरिक ताकदीची स्पर्धा नसून शिस्त, संयम, निष्ठा आणि संस्कारांची साधना असते. आमदार लांडगे यांच्या जीवनातही या तालमीतील संस्कारांना विशेष स्थान आहे. त्यामुळे जुन्या सवंगड्यांची ही भेट केवळ औपचारिक भेट न राहता संघर्षाच्या आणि जडणघडणीच्या प्रवासाला उजाळा देणारा भावनिक क्षण ठरली. या भेटीबाबत भावना व्यक्त करताना आमदार लांडगे म्हणाले, "ज्या मातीने मला घडवलं, ज्या तालमीने संस्कार दिले आणि ज्या वस्तादांनी मार्गदर्शन केलं, त्यांच्याप्रतीची कृतज्ञता कायम आहे.

धर्मांतर करणाऱ्यांना जुन्या जाती-धर्माच्या आधारे मागासवर्ग आरक्षणाचे लाभ मिळणार नाही

■ पिंपरी-चिंचवड(दै. संध्या)

महाराष्ट्रामध्ये धर्मांतर बंदी कायदा लागू झाल्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने देखील एक अत्यंत महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक निर्णय दिला आहे. धर्मांतर केल्यानंतर जुन्या जाती-धर्माच्या आधारे मागासवर्ग आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, असा स्पष्ट निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे खऱ्या मागासवर्गीय आणि अनुसूचित जातीतील (SC) नागरिकांच्या हक्कांचे रक्षण होणार असून, फसवणूक करून लाभ घेणाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे, अशी प्रतिक्रिया आमदार अमित गोरखे यांनी दिली.

पावसाळी अधिवेशनादरम्यान महाराष्ट्रातील बळजबरी, फसवणूक आणि विविध आमिषे दाखवून होणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतराचा गंभीर विषय आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात लक्षवेधी सूचनेद्वारे अत्यंत आक्रमकपणे मांडला होता. काही 'क्रिस्तो ख्रिश्चन'- ज्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे, परंतु ते कागदोपत्री अजूनही अनुसूचित जातीचे (SC) प्रमाणपत्र वापरून सवलती व आरक्षणाचा लाभ घेत आहेत, ही बाब आमदार गोरखे यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिली होती. यामुळे खऱ्या अर्थाने गरजू आणि पात्र असलेल्या अनुसूचित जातीतील नागरिकांवर मोठा अन्याय होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले होते. आमदार अमित गोरखे यांच्या या लक्षवेधी सूचनेची गांभीर्याने दखल घेत, माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी सभागृहात धर्मांतराविरोधात कठोर कायदा करण्याचे आश्वासन दिले होते.

पदवीधर, शिक्षक मतदारसंघात महायुतीचा विजय निश्चित : आमदार शंकर जगताप

■ पिंपरी (दै. संध्या)

नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची एकजूट, परस्पर समन्वय आणि नियोजनबद्ध प्रयत्नांच्या बळावर पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास चिंचवड मतदार संघाचे आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला. निवडणुकीच्या तयारीसाठी चिंचवड येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते गुरुवारी (दि. १५) बोलत होते.

या बैठकीला भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी महापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल, सरचिटणीस मधुकर बच्चे, मोरेश्वर शेंडगे, चिंचवड मतदारसंघातील



मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, ॲड. हर्षद नढे, सोमनाथ तापकीर, सनी बारणे, मोहन राऊत, यांच्यासह महायुतीचे प्रमुख पदाधिकारी, मतदारसंघातील सर्व नगरसेवक, नगरसेविका, भाजपचे पदाधिकारी आणि मंडलाध्यक्ष उपस्थित होते. आमदार शंकर जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत निवडणुकीची पूर्वतयारी, मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठीचे नियोजन आणि संघटनात्मक जबाबदाऱ्यांबाबत चर्चा करण्यात आली. पुणे पदवीधर मतदारसंघाच्या भाजप उमेदवार डॉ.स्मिता योगेश जाधव आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना विजयी करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन आमदार जगताप यांनी केले.महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने निवडणुकीच्या तयारीला लागावे यासाठी बैठकीत सूचना देण्यात आल्या. मतदारांशी थेट संपर्क साधून नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्यात येत आहे. संघटनात्मक ताकद आणि नियोजनाच्या माध्यमातून दोन्ही उमेदवारांचा विजय निश्चित आहे.

मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध मोहीम राबवा : सांडभोर

■ पिंपरी (दै. संध्या)

चालू आर्थिक वर्षातील कर वसुलीचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या आहेत. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे करसंकलन व कर आकारणी विभागाची आढावा बैठक घेतली. बैठकीत मालमत्ता कराची थकबाकी, मालमत्ता जप्तीची कारवाई, मालमत्ता हस्तांतरणाची प्रकरणे, सारथी पोर्टलवरील प्रलंबित तक्रारी तसेच मागील बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस कर संकलन व कर आकारणी विभागाचे उप आयुक्त सचिन पवार, प्रशासन अधिकारी रश्मी देशपांडे, सहाय्यक मंडल अधिकारी बाळू लोंढे, हनुमंत सरवदे, मनोज शिंदे, अजित नखाते, रणजीत भोसले, जयंत मरळीकर, राजेश बांदल, रविंद्र शिंदे, राजेंद्र कुदळे, प्रसाद एच. एस, राकेश सौदे, अतुल काळे, नाना सोनटके, खुकाळे एस, निता राणे, डी. डी. गोरडे, हनुमंत मोरे, मिलिंद कांबळे तसेच कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर म्हणाल्या, चालू आर्थिक वर्षासाठी निश्चित करण्यात मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियोजनबद्ध आणि प्रभावीपणे काम करावे. महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये मालमत्ता कराच्या उत्पन्नाचा मोठा वाटा असतो. या उत्पन्नाच्या आधारे विविध विकासकामे आणि नागरी सुविधांसाठी आर्थिक नियोजन करण्यात येते. त्यामुळे मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

पुणे पदवीधर व शिक्षक निवडणुकीत विजयासाठी भाजपाची मोर्चेबांधणी!

आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक : मतदार संपर्क, बूथनिहाय जबाबदाऱ्या आणि संघटनात्मक समन्वयावर भर

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

आगामी पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजपा पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, प्रभारी आणि कार्यकर्त्यांची एकत्रित नियोजन बैठक आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत पार पडली. निवडणुकीची पूर्वतयारी, प्रचार यंत्रणेचे नियोजन आणि मतदारांशी प्रभावी संपर्क साधण्याच्या दृष्टीने बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या भाजपा-महायुतीच्या उमेदवार डॉ. स्मिता‌देवी योगेश जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार श्री. कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारासाठी संघटनात्मक



यंत्रणा अधिक सक्रिय करण्यावर भर देण्यात आला. मतदार संपर्क, बूथनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप आणि पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधील समन्वय अधिक मजबूत करण्याबाबत आमदार लांडगे यांनी मार्गदर्शन केले.

पदवीधर आणि शिक्षक मतदारांच्या अपेक्षा, स्थानिक प्रश्न व अडचणी समजून घेण्यासाठी त्यांच्याशी सातत्यपूर्ण संवाद साधणे आवश्यक असल्याचे लांडगे यांनी सांगितले. मतदारांपर्यंत पोहोचताना त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे. प्रत्येक स्तरावरील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापली जबाबदारी ओळखून नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रचारातील सातत्य आणि परस्पर समन्वयाच्या माध्यमातून मतदार संपर्काला गती देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. दोन्ही उमेदवारांना पहिल्या पसंतीचे मत मिळवून देण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली पुण्यासह राज्यातील पाचही जागांवर विजय मिळवण्याचा संकल्प पक्षाने केला आहे, असेआमदार लांडगे यांनी यावेळी स्पष्ट केले. पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. दोन्ही मतदारसंघांतील नोंदणीकृत मतदारांनी आपापल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

शिक्षक आणि पदवीधर हे समाजाच्या प्रगतीला दिशा देणारे महत्त्वाचे घटक आहेत. त्यांच्या अपेक्षा आणि प्रश्न समजून घेऊन त्यांच्याशी सातत्याने संवाद साधणे, ही आमची जबाबदारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली पुण्यासह राज्यातील पाचही जागांवर विजय मिळवण्याचा संकल्प भाजपाने केला आहे. संघटनेची ताकद आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीच्या बळावर हा संकल्प साकार होईल, असा विश्वास आहे, असे महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे यांनी सांगितले.

थोडक्यात पण महत्वाचे



शिरूरमध्ये २४ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

शिरूर : दैनिक संध्या

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या वाचन प्रेरणा दिनानिमित्त शिरूरमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिरूर रिक्रिएशन क्लब अँड लायब्ररी यांच्या वतीने शाळांमध्ये वाचनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी व्याख्याने, सामूहिक वाचन तसेच ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले. शिरूर रिक्रिएशन क्लब अँड लायब्ररीच्या वतीने शिरूर नगरपरिषद शाळा व अन्य शाळांमध्ये 'मुलांकरीता वाचन पेटी हा उपक्रम राबविण्यात येणार असून विदयार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे रिक्रिएशन क्लबचे अध्यक्ष रवींद्र धनक यांनी सांगितले. 'वाचल्यामुळे मी कसा घडलो!' या विषयांवर व्याख्यान यावेळी देण्यात आले. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांकडून नियमित वाचन करण्याबाबत व वाचन चळवळ वृद्धिंगत करण्याबाबत सामूहिक प्रतिज्ञा करण्यात आली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची ओळख व्हावी, यासाठी त्यांना ग्रंथालयास भेट देण्याचे आवाहन ही यावेळी करण्यात आली. वाचन प्रेरणा दिनानिमित्त जिजामाता उद्यान येथे ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन शिरूर रिक्रिएशन क्लब, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयातील मराठी विभाग, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा शिरूर यांनी आयोजन केले होते. हे सर्व उपक्रम यशस्वी होण्यासाठी शिरूर रिक्रिएशन क्लबचे अध्यक्ष रवींद्र धनक, ग्रंथपाल कल्पना मोरे, दत्तात्रेय शिंदे मोहम्मद हुसेन पटेल,लक्ष्मण शिंदे, निखिल मगर, सतिश धुमाळ , हर्षद शिर्के, गौतम कर्डीले आदींनी प्रयत्न केले.



लॉन्ड्री दुकानाला आग; लाखो रुपयांचे नुकसान

खेड शिवापूर : दैनिक संध्या

शुक्रवारी (दि. १६) पहाटेच्या सुमारास लॉन्ड्री संघटनेचे पुणे जिल्हा संघटक प्रमोद गायकवाड यांच्या लॉन्ड्री दुकानाला आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले. दुकानातील लोखंडी वस्तू सोडली तर इतर सर्व कपड्यांची राख झाल्याचे दिसून आले. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. दरम्यान दुकानाशेजारी राहणारे जितेंद्र सुर्वे हे पहाटे ५ वाजता बांधकामाला पाणी मारण्यासाठी आले असता आग लागल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ गायकवाड यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. अवघ्या २०-२५ मिनिटात अग्निशामक दलाने आग आटोक्यात आणली. प्रारंभी गावातील तरुणांनी मोठ्या संख्येने येऊन आग आटोक्यात आणण्याचा पूर्ण प्रयत्न केला, मात्र आगीने रौद्र रूप धारण केले असल्याने सर्व प्रयत्न अपुरे पडले.



आंबी बुद्रुक येथे वाचन प्रेरणा दिन साजरा

आंबी : दैनिक संध्या

सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या आंबी बुद्रुक येथील सोमेश्वर विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.विद्यालयाचे मुख्याध्यापक विजयकुमार शिंदे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते.यावेळी विद्यालयातील शिक्षक हेमंत गडकरी यांनी अब्दुल कलाम यांच्या जीवनातील काही प्रेरक प्रसंग सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक बाळू बालगुडे,सोमनाथ डगळे,महेंद्र कुतवळ, नूतन काळाणे, लीना जराड, शुभांगी जगताप उपस्थित होते. अब्दुल कलाम यांना विद्यार्थ्यांच्या वतीने अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेच्या भोवती बसत वाचन करून तसेच वाचनाचा निश्चय करून अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयातील शिक्षक संतोष जेधे यांनी केले.



डॉ. स्मिता जाधव व कौस्तुभ गावडे विक्रमी मतांनी विजयी होतील : पराग अळवणी

जेजुरी : दैनिक संध्या

पुणे पदवीधर व शिक्षक मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार डॉ स्मिता जाधव आणि कौस्तुभ गावडे हे अतिशय सुशिक्षित व उच्चपदवीधर असून पदवीधर व शिक्षक मतदारांचे प्रश्न सोडविण्यास कटिबद्ध आहेत. पुणे मतदार संघात महायुतीचे दोन्ही उमेदवार विक्रमी मतांनी विजयी होतील असा विश्वास विलेपार्ले येथील आमदार पराग अळवणी यांनी व्यक्त केला. पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीच्या प्रचारसंदर्भात जेजुरी येथील पेशवे हॉल येथे कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विलेपार्लेचे आमदार पराग अळवणी ,पुणे जिल्हा भाजपाचे अध्यक्ष शेखर वढणे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. माजी आमदार संजय जगताप यांनी ही निवडणूक वेगळी असून कार्यकर्त्यांनी मतदारांच्या घरापर्यंत पोहचून महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करावा असे आवाहन केले. तसेच माजी आमदार अशोक टेकवडे यांनी शरद लाड यांच्या सारखे मार्गदर्शक आपल्या बरोबर असून महायुतीच्या उमेदवारांचा विजय निश्चित आहे असे सांगितले. पुरंदर तालुक्यात भाजपा कार्यकर्त्यांची फळी सक्रिय असून सूक्ष्म नियोजन करून प्रचार केला जात आहे. तालुक्यातून मोठे मताधिक्य मिळेल असे यावेळी प्रास्ताविक भाषणात जेजुरी शहर भाजपाचे अध्यक्ष सचिन पेशवे यांनी सांगितले.

सराईत गुन्हेगार अंबादास पवारवर एम.पी.डी.ए.ची कारवाई

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे आदेश; नागपूर मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध

■ वालचंदनगर (दै. संध्या)



इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार अंबादास तात्या पवार (वय ३८, रा. विठ्ठलवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) याच्याविरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व इतर संबंधित कायद्यांनुसार (एम.पी.डी.ए.) स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशानुसार त्याला नागपूर मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंबादास पवार याच्याविरुद्ध सन २०११, २०१४, २०१६, २०२४, २०२५ आणि २०२६ या वर्षांत विविध गुन्हे दाखल असल्याचा उल्लेख प्रसिद्धिपत्रकात आहे. त्यामध्ये जबरी चोरी, दरोडा, दरोड्याची पूर्वतयारी, बेकायदेशीर जमाव जमविणे, जबर दुखापत करणे, खंडणी मागणे आणि इतर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. त्याच्या कथित गुन्हेगारी कृत्यांमुळे सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा निर्माण होत असल्याने त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

वालचंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी वरिष्ठांकडे प्रस्ताव सादर केला. त्यानंतर पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशानुसार स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली. दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधित इसमाला ताब्यात घेऊन नागपूर मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्यात आल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, बारामती विभागाचे अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, बारामती उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत बारामती उपविभागाचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर (स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण), वालचंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार, सहायक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे, तत्कालीन प्रभारी अधिकारी अविनाश घोरपडे, पोलीस उपनिरीक्षक महेश बनकर, तसेच पोलीस कर्मचारी रामदास बाबर, शैलेश स्वामी, किर्तीलाल गायकवाड, गणेश झरेकर, गणेश काटकर, विकास निर्मळ, अभिजीत कळसकर, विक्रमसिंह जाधव, गणेश वानकर, अजित राऊत आणि राहुल माने यांनी सहभाग घेतला. सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर लक्ष ठेवून गंभीर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आवश्यक ती कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे निर्देश पुणे ग्रामीण पोलिसांकडून देण्यात आले आहेत.



४ लाख ५० हजारांचे १८ मोबाईल हस्तगत

■ नारायणगाव (दै. संध्या)

नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीत सन जानेवारी २०२६ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत लोकांचे हरविलेले मोबाईल फोन CEIR PORTAL च्या माध्यमातून पोलीस स्टेशनने तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन ४ लाख ५० हजार रुपये किंमतीचे विविध कंपन्यांचे एकूण १८ मोबाईल फोन विविध जिल्ह्यांतुन तसेच काही इतर राज्यांतुन हस्तगत केले असून ते संबंधित मोबाईलचे मालकांना खात्री करून परत देण्यात आले आहेत. सदरची कार्यवाही पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर धनंजय पाटील यांनी नारायणगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक प्रविण संपांगे यांना सदर मोबाईलचा शोध घेणे कामी योग्य त्या सूचना दिल्या होत्या त्यानुसार नारायणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सोनकांबळे, डीबी पथकाचे इन्चार्ज पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पो. हवा मंगेश लोखंडे, पो.शि सोमनाथ डोके, सत्यम केळकर, टिलेश जाधव, आदेश दहिवाळ यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईलचा शोध घेऊन एकूण ४ लाख ५० हजार रुपये किंमतीचे एकूण १८ मोबाईल लोकांकडून हस्तगत करून नागरिकांना परत करण्यात आले आहेत. या पूर्वी देखील अशाच प्रकारे १३ लाख ९६ हजार रुपये किंमतीचे ६३ मोबाईलचा शोध घेऊन हस्तगत केले असून सदर मोबाईल त्यांचे मुळ मालकांना परत करण्यात आले आहेत. तसेच सन २०२५ ते २०२६ या कालावधीत आज रोजीपर्यंत एकूण १८ लाख ४६ हजार रुपये किंमतीचे एकूण ८१ मोबाईलचा विविध जिल्ह्यांतुन तसेच काही इतर राज्यांतुन शोध घेऊन ते हस्तगत करून नागरिकांना परत करण्यात आले आहेत.

पालखी महामार्गावरील दुभाजकातील झाडांची छाटणी सुरू

वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे पाऊल; जाचक वस्ती ते अंथूर्णे दरम्यान अपघातांचा धोका

■ वालचंदनगर (दै. संध्या)



श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावरील बारामती - इंदापूर रस्त्यावरील मधल्या दुभाजकात वाढलेल्या लाल-गुलाबी रंगाच्या झाडांची तोड व छाटणी करण्याचे काम सध्या सुरू करण्यात आले आहे. या झाडांच्या फांद्या रस्त्यावर येत असल्याने वाहनचालकांना, विशेषतः ओव्हरटेक करताना, अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे वाहनांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावरील इंदापूर तालुक्यातील बेलवाडी,जाचक वस्ती,चिखली फाटा ते अंथूर्णे दरम्यानच्या मधल्या दुभाजकात काही ठिकाणी पलीकडील रस्त्यावर जाण्यासाठी लहान वाटा तयार झाल्या आहेत. या वाटांमधून दुचाकीस्वार रस्ता ओलांडून पलीकडे जात असताना दुभाजकातील झाडांमुळे समोरून येणाऱ्या वाहनचालकांना दुचाकी सहजपणे दिसत नव्हती. परिणामी, या ठिकाणी अपघातही घडले आहेत.

दुभाजकातील झाडांच्या फांद्या रस्त्यावर पसरल्याने ओव्हरटेक करताना वाहनांना त्या लागत होत्या. तसेच दुभाजकातून अचानक रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीस्वारांमुळे अपघाताचा धोका निर्माण होत होता. या पार्श्वभूमीवर संबंधित झाडांची छाटणी व तोड करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. दुभाजकातील झाडांची योग्य छाटणी झाल्यास वाहनचालकांना रस्त्यावरील दृश्यमानता अधिक चांगली मिळण्यास मदत होईल. विशेषतः दुभाजकातील लहान वाटांमधून रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीस्वारांची वाहने समोरून येणाऱ्या चालकांना वेळेत दिसण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे या मार्गावरील अपघातांचा धोका कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मात्र, दुभाजकातील अनधिकृत किंवा धोकादायक वाटांमधून अचानक रस्ता ओलांडणे टाळणे, तसेच वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे. संबंधित यंत्रणांनीही या ठिकाणांची पाहणी करून आवश्यक त्या सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जेजुरीत दसरा उत्सवाची जय्यत तयारी

सायंकाळी ६ वाजता पालखी सोहळ्याचे प्रस्थान मध्यरात्री १ ते २ दरम्यान देवभटीचा सोहळा

■ जेजुरी (दै. संध्या)



महाराष्ट्राचे कुलदैवत आणि बहुजन बांधवांचा लोकदेव असलेल्या जेजुरीच्या खंडेरायाचा मर्दानी दसरा उत्सव मंगळवारी (दि.२०) रोजी साजरा होणार असून सायंकाळी ६ वाजता गडकोट आवारातून पालखी प्रस्थान होणार आहे . मध्यरात्री १ ते २ वाजण्याचे सुमारास जयाद्री डोंगर रांगेत रमना परिसरात फटाक्यांच्या आतषबाजीत देवभेट, आपटा पूजन, नगरप्रदक्षणा करत बुधवारी (दि.२१)सकाळी पालखी सोहळा गडावर दाखल होऊन रोजमुरा वाटप होऊन खंडास्पर्धेला सुरुवात होणार असल्याची

■ ग्रामस्थ मानकरी व विश्वस्त मंडळाची संयुक्तिक बैठक संपन्न

माहिती प्रमुख वतनदार इनामदार राजेंद्र पेशवे, सचिन पेशवे, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, यांनी ग्रामस्थ मंडळाच्या नियोजन बैठकीत दिली.

कुलदैवत खंडेरायाचे वर्षातून आठ जत्रा यात्रा उत्सव साजरे केले जातात यामध्ये सर्वात मानाचा व मोठा मर्दानी दसरा उत्सव समजला जातो .नगरीतील अठरापगड जातीधर्मातील समाजबांधवांना दसरा उत्सवात मान पान आहेत .हे मानपान सांभाळत सामाजिक सलोखा जोपासत अवघा जेजुरीवासीय हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतो सुमारे २२ तास चालणाऱ्या या उत्सवाला मर्दानी मराठमोळा दसरा असे नाव प्रचलित झाले आहे.

या उसवाच्या नियोजनासाठी ग्रामस्थ मंडळ व देवसंस्थान विश्वस्त मंडळाच्या बैठकीचे आयोजन मल्हार गौतमेश्वर मंदिर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सचिव छबन कुदळे, नगरसेवक पै.कृष्णा कुदळे, रोहिदास माळवदकर, रामभाऊ माळवदकर, संजय खोमणे, सुधीर गोडसे, यशवंत दोडके, समीर मोरे, काशिनाथ मोरे, समीर मुलाणी, खंडू भालेराव, अनिल झगडे, ओंकार झगडे, सुशील राऊत, महादेव बारभाई, देवसंस्थान प्रमुख विश्वस्त विश्वास पानसे, मंगेश घोणे, अभिजित देवकाते, पोपट खोमणे, व्यवस्थापक आशिष बाठे आदींसह ग्रामस्थ खांदेकरी मानकरी, पुजारी, सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवसंस्थानच्या वतीनेही उत्सवाची जय्यत तयारी केल्याचे सांगण्यात आले. सचिव छबन कुदळे यांनी आभार मानले. कडेपठार देवसंस्थान विश्वस्त मंडळ ग्रामस्थ बैठकीला उपस्थित राहत नाहीत.त्यांनी ग्रामस्थांबरोबर समन्वय ठेवावा, नगारखान्याची दुरुस्ती करावी दर्शन बारीला हिरवी नेट बसवली आहे ती काढून घ्यावी आदी मागण्या ग्रामस्थांनी मांडल्या.

देऊळगाव रसाळच्या पाणीटंचाईची सभापती किरण तावरे यांच्याकडून पाहणी

टँकर, विहीर खोलीकरण, ओढ्यातील गाळ काढणे आणि जनावरांच्या चाऱ्यासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन; नगरसेवक परमेश्वर कदम यांच्याकडून एक लाखांची मदत

■ बारामती (दै. संध्या)



देऊळगाव रसाळ येथे वाढत्या पाणीटंचाईमुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची दखल घेत सभापती किरण तावरे यांनी एन्व्हायर्नमेंटल फोरमच्या पदाधिकाऱ्यांसमवेत गावाला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या दौऱ्यात ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने टँकर सुरू करणे, विहिरींचे खोलीकरण, ओढ्याचे खोलीकरण तसेच जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या समस्यांवर प्रशासकीय पातळीवर तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन किरण तावरे यांनी दिले.

गावातील सार्वजनिक विहिरी आणि विंधन विहिरींची पाणीपातळी घटल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. कमी पावसामुळे शेती आणि जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत ग्रामस्थांनी आपल्या अडचणी सभापतींसमोर मांडल्या.


गावातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन तातडीने सरकारी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, पाण्याचे प्रमुख स्रोत असलेल्या विहिरींचे खोलीकरण करून त्यातील गाळ काढावा, तसेच नवीन विंधन विहिरींची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. याशिवाय ओढ्याचे खोलीकरण करून पाणीसाठा वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी चारा छावणी अथवा अन्य पर्यायी व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना सभापती किरण तावरे म्हणाले की, देऊळगाव रसाळ येथील टंचाईची परिस्थिती गंभीर असून नागरिकांना आणि शेतकऱ्यांना दिलासा देणे ही प्राथमिकता आहे. गावात तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था करण्यात येईल. नवीन विंधन विहिरींची कामे तातडीने करण्यात येतील. तसेच एन्व्हायर्नमेंटल फोरमच्या माध्यमातून ओढा खोलीकरणाचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात येईल. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाशी चर्चा करून योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. देऊळगाव रसाळचे रहिवासी आणि सध्या मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक असलेले परमेश्वर कदम यांनी गावाप्रती सामाजिक बांधिलकी जपत तलावातील गाळ काढण्याच्या कामासाठी आर्थिक मदत केली. तलावातील गाळ काढण्यासाठी लागणाऱ्या यंत्राच्या डिझेल खर्चासाठी कदम यांनी एक लाख रुपये रोख स्वरूपात ग्रामस्थ आणि ग्रामसेवक यांच्याकडे सुपूर्द केले. त्यांच्या या मदतीमुळे तलावातील गाळ काढण्याच्या कामाला हातभार लागणार आहे.

या पाहणी दौऱ्यावेळी बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव, उपसभापती शुभांगीताई आगवणे, जिल्हा परिषद सदस्या पल्लवीताई खेत्रे, गटनेते बाबा चोरमले, पंचायत समिती सदस्या शामलताई वाबळे, नगरसेवक प्रवीण माने, अमोल कावळे, मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक परमेश्वर कदम, सरपंच मीराताई रसाळ, एन्व्हायर्नमेंटल फोरमचे नलवडे साहेब, खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष अंकुशराव रसाळ, दूध संघाचे माजी अध्यक्ष सुरेश रसाळ, माजी उपसभापती दत्तात्रय लोंढे, माजी उपसरपंच दत्तात्रय वाबळे, विजय भिसे, लालासो रसाळ, हनुमंत रसाळ, हनुमंत वाबळे, तानाजी रसाळ, आबा सपकळ, बडेभाई इनामदार, आजमभाई इनामदार, नागेश रसाळ, दीपक नाना वाबळे, गणेश रसाळ, रामदास थोरात, लक्ष्मण वाबळे, अमोल रसाळ, अजित वाबळे, प्रताप वाबळे, दादासो वाबळे, विकास लोंढे, महेश अवघडे, दत्तात्रय रसाळ, प्रशासक कुचेकर, ग्रामसेवक जगताप यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सभापती किरण तावरे यांच्या प्रत्यक्ष पाहणी दौऱ्यामुळे गावातील पाणीटंचाई, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि जनावरांच्या चाऱ्याच्या प्रश्नावर उपाययोजना होण्याची अपेक्षा ग्रामस्थांना आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा, विहीर व ओढा खोलीकरण आणि तलावातील गाळ काढण्याच्या कामांना गती मिळाल्यास गावातील नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



‘जीएसएमएआय’सोबत सामंजस्य करार करणारे महाराष्ट्र पहिले राज्य : मुख्यमंत्री फडणवीस

■ मुंबई(दै. संध्या)

जागतिक स्तरावर कुशल मनुष्यबळाची वाढती गरज लक्षात घेता, महाराष्ट्रातील युवकांच्या कौशल्यांना आंतरराष्ट्रीय संधींची जोड देणे ही काळाची गरज आहे. ग्लोबल स्किल्स मोबिलिटी असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण, आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी, परदेशी भाषांचे ज्ञान आणि जागतिक कौशल्य यांच्यात समन्वय साधण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

नवी दिल्लीतील आयटीसी मौर्या येथे जागतिक मनुष्यबळ गतिशीलतेमध्ये भारताची भूमिका अधिक मजबूत करण्यासाठी, १७ संस्थापक संस्था, शासकीय प्रतिनिधी, राजनैतिक दूतावास, राज्य सरकारे आणि उद्योगपतींना एकत्र आणणाऱ्या ‘ग्लोबल स्किल्स मोबिलिटी असोसिएशन ऑफ इंडिया’ (जीएसएमएआय)ची १२ ऑक्टोबर रोजी औपचारिक स्थापना झाली.



यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी, खासदार तथा संसदेच्या कामगार, वस्त्रोद्योग आणि कौशल्य विकासविषयक स्थायी समितीचे अध्यक्ष शशांक मणी, डेन्मार्कचे भारतातील राजदूत रास्मस अबिल्डगार्ड क्रिस्टेन्सन, जर्मनीचे उपराजदूत जॉर्ज एन्झ्मवायलर, इटलीच्या दूतावासाच्या उपप्रमुख ऑरोरा रुसी, ओडिशा शासनाचे सचिव भूपेंद्र सिंह पूनिया, टीमलीज डिजिटलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नीती शर्मा, क्वेस कॉर्पचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी लोहित भाटिया, बॉर्डरप्लसचे सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी मयंक कुमार, ‘जीएसएमएआय’चे संस्थापक अध्यक्ष अजय खन्ना, मॅजिक बिलियनचे सहसंस्थापक बसब बॅनर्जी, तसेच गतीह फाउंडेशनचे पदाधिकारी, महाराष्ट्र शासनाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा आणि विविध देशांचे राजनैतिक प्रतिनिधी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील युवकांना त्यांच्या कौशल्यांच्या बळावर परदेशात उत्कृष्ट रोजगाराच्या संधी मिळाव्यात. महाराष्ट्रातील अगदी दुर्गम भागातील तरुण-तरुणींना जगातील कोणत्याही देशात करिअर घडविण्याचा आत्मविश्वास मिळावा, यासाठी आवश्यक कौशल्ये, आर्थिक सहाय्य आणि संस्थात्मक पाठबळ उपलब्ध झाले पाहिजे. जागतिक रोजगाराच्या संधी केवळ काही मोजक्या लोकांपुरत्या मर्यादित न राहता राज्यातील सर्वसामान्य युवकांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे.

उद्घाटन सोहळ्यात ‘स्थानिक कौशल्य, जागतिक महत्त्वाकांक्षा’ विषयावर चर्चा

परराष्ट्र मंत्रालयाचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी ‘जीएसएमएआय’च्या लोगोचे व वेबसाइटचे अनावरण केले. ते म्हणाले की, भारताच्या जागतिक कौशल्य गतिशीलतेकडे केवळ कामगारांचे स्थलांतर म्हणून न पाहता, तरुणांना अनुभव मिळवण्याची, नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची आणि भारताच्या विकासात योगदान देण्याची मोठी संधी म्हणून पाहिले पाहिजे.

‘जीएसएमएआय’चे संस्थापक अध्यक्ष अजय खन्ना यांनी जागतिक रोजगाराचे विश्वासार्ह मार्ग तयार करण्यासाठी उद्योग क्षेत्राच्या एकत्रित प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, “‘जीएसएमएआय’मुळे आपल्याला सोयीपेक्षा विश्वासार्हतेला आणि तात्पुरत्या तडजोडीपेक्षा संस्थात्मक उभारणीला प्राधान्य देण्याची संधी मिळाली आहे.”या विषयावरील परिसंवादात ओडिशा शासनाचे आयुक्त-सह-सचिव भूपेंद्र सिंह पूनिया, टीमलीज डिजिटलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नीती शर्मा आणि क्वेस कॉर्पचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी लोहित भाटिया यांनी सहभाग घेतला. बॉर्डरप्लसचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मयंक कुमार यांनी परिसंवादाचे सूत्रसंचालन केले, तर मॅजिक बिलियनचे सहसंस्थापक बसब बॅनर्जी यांनी समारोप केला. भारतीय युवकांना जागतिक रोजगारासाठी तयार करताना कौशल्य विकास, उद्योगांच्या गरजांनुसार प्रशिक्षण, भाषेचे ज्ञान, सांस्कृतिक समज आणि रोजगारानंतरचे सहकार्य यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, राज्यातील युवकांना जागतिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शाश्वत मार्ग निर्माण करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग काम करत आहे. महाराष्ट्र हे उद्योग, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात सातत्याने पुढाकार घेणारे राज्य आहे. ‘जीएसएमएआय’च्या सहकार्यामुळे राज्यातील कौशल्य विकास व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय रोजगार क्षेत्र यांच्यातील दुवा अधिक मजबूत होईल. युवकांना जागतिक गरजांनुसार प्रशिक्षित करून त्यांच्या क्षमता आणि गुणवत्तेला आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देणे, हे मुख्य उद्दिष्ट आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील युवक केवळ जागतिक रोजगाराच्या संधींचा लाभ घेणार नाहीत, तर आपल्या ज्ञानातून, अनुभवातून आणि कौशल्यातून देशाच्या आर्थिक प्रगतीतही योगदान देतील, असा विश्वास कौशल्य मंत्री लोढा यांनी व्यक्त केला. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. जागतिक स्तरावरील मनुष्यबळाच्या मागणीचे रोजगाराच्या संधींमध्ये रूपांतर करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. प्रत्येक देशातील व्यवसायाधारित विशिष्ट मागणी ओळखून जिल्हास्तरावरील युवकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. उद्योग भागीदार, नियोक्ता नेटवर्क, भरती कौशल्ये आणि प्रशिक्षण क्षमता यांच्यात समन्वय साधला जात आहे. महाराष्ट्र शासनाने या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी ‘महिमा’ (महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतिशीलता आणि क्षमता संस्था) या विशेष कलम ८ अंतर्गत कंपनीची स्थापना केली आहे. परदेशातील रोजगाराच्या संधी सुलभ करणे आणि जागतिक कौशल्य गतिशीलतेला चालना देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. महाराष्ट्राच्या कौशल्य विकास परिसंस्थेत १,००० हून अधिक औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि १,८०० हून अधिक तांत्रिक शिक्षण संस्थांचा समावेश आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

मतमोजणी प्रक्रिया अचूक, पारदर्शक व शांततेत पार पाडावी

छत्रपती संभाजीनगर : औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक २०२६ ची मतमोजणी प्रक्रिया अचूक, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने आणि सांघिक भावनेने काम करावे. प्रत्येकाने आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडावी, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांनी दिले. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आज वंदे मातरम् सभागृहात मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विजय गौंडा जी.सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्यासह मराठवाडा विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. औरंगाबाद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत ४१ उमेदवार रिंगणात असून, विभागात एकूण ८४२ मतदान केंद्रे आहेत. मतमोजणीसाठी सुमारे ५०० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महिला संकटातून कुटुंबाला सावरणारी खरी ताकद आहेत

धुळे : सकाळी घरातील कामे आटोपून शेताची वाट धरणारी, उन्हातान्हात पेरणीपासून निंदणी, कोळपणीपर्यंत राबणारी आणि पुन्हा कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी महिला ही खऱ्या अर्थाने शेतीचा कणा आहे. कुटुंबावर संकट आले, आर्थिक अडचणी निर्माण झाल्या, तरी हिंमत न हारता कुटुंबाला सावरण्याचे सामर्थ्य महिलांमध्ये असते. त्यांच्या कष्टांचा केवळ गौरव न करता त्यांना समान संधी, आर्थिक स्वावलंबन आणि योग्य सन्मान मिळाला पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. सेवा संकल्प अभियानांतर्गत कृषी विभाग, आत्मा, धुळे आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आज हिरे भवन येथे आयोजित महिला शेतकरी मेळावा व प्रदर्शनाला पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित केले. यावेळी आमदार मंजूळा गावित, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे, महिला शेतकरी उपस्थित होत्या.

उमरखेड मतदारसंघातील हायब्रिड ॲन्युईटी टप्पा-२ मधील रस्ते कामांचा भोसले यांनी घेतला आढावा

■ मुंबई(दै. संध्या)

उमरखेड विधानसभा मतदारसंघातील हायब्रिड ॲन्युईटी टप्पा-२ अंतर्गत करण्यात येत असलेल्या कामांचा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आढावा घेतला. आमदार किसन वानखेडे यांच्या विनंतीनुसार मंत्रालयातील मंत्री दालनात झालेल्या आढावा बैठकीत पुसद-गौळ-वसंतनगर-उमरखेड-ढाणकी-कुरळी रामा-२६२ या मार्गावरील किमी १/८०० ते ५७/०० या पॅकेज ५.१ सी आणि विडूळ-चालगणी-साखरा-खरूस-देवसरी ते जिल्हा सीमेपर्यंत प्रजिमा-६१ या मार्गावरील किमी ०/०० ते १८/४०० या पॅकेज ५.१ डीमधील अतिरिक्त कामांचा आढावा घेण्यात आला.

पुसद-उमरखेड हा मराठवाडा आणि विदर्भाला जोडणारा महत्वाचा राज्य मार्ग आहे. पोफाळी येथील साखर कारखान्यामुळे होणारी वाहतूक तसेच पैनगंगा नदीवरील सहस्रकुंड धबधब्याकडे जाणाऱ्या पर्यटकांच्या दृष्टीनेही या मार्गाला महत्व आहे. या पॅकेजमध्ये संपूर्ण रस्ता सात मीटरऐवजी दहा मीटर रुंद करणे, उमरखेड शहर आणि पोफाळी येथे चौपदरीकरण करणे, प्रत्येक गावात बसथांबे उभारणे, चौकांमधील रस्त्यांची रुंदी वाढविणे आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सिमेंट नाले बांधणे आदी अतिरिक्त कामांची मागणी आमदार वानखेडे यांनी केली. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या उपस्थित अधिकाऱ्यांनी या कामांसाठी आवश्यक अतिरिक्त खर्चाची माहिती दिली. अतिरिक्त कामे करावयाची असल्यास अतिरिक्त निधी उपलब्ध करणे किंवा प्रगतिपथावरील पॅकेजमधील कामांचा वाव अतिरिक्त कामांच्या किमतीइतका कमी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. काम सुरू झाल्यानंतर उद्भवणारी अतिरिक्त कामे करारनाम्याच्या मंजूर किमतीच्या मर्यादेत करण्याचे शासनाचे धोरण असल्याची माहितीही त्यांनी दिली.

विडूळ-चालगणी-साखरा-खरूस-देवसरी ते जिल्हा सीमेपर्यंतच्या पॅकेज ५.१ डीमधील कामाबाबतही बैठकीत चर्चा झाली. हा मार्ग प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचा आणि कमी वाहतुकीचा असल्याने संपूर्ण लांबीतील काम मंजूर वावाप्रमाणे कार्यान्वित करावे, अशी सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांनी केली. अतिरिक्त कामांसाठी प्रगतिपथावरील पॅकेजच्या अंदाजित मंजूर लांबीपैकी काही लांबी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचविल्यानुसार कमी करावी आणि वगळण्यात येणारी लांबी हायब्रिड ॲन्युईटीच्या पुढील टप्पा-३ मध्ये प्रस्तावित करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (रस्ते) शरद राजभोज, उपसचिव (रस्ते) बोरसे, म.रा.पा.सु.वि. महामंडळ मर्यादितचे मुख्य अभियंता रणजित हांडे, विशाल जवंजाळ, वरिष्ठ तांत्रिक सल्लागार (अ. अ. स्तर) प्रशांत पागृत आणि कार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम उपस्थित होते.



चला शाळेत जाऊ या’ अभियानातून शाळांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य

■ ठाणे(दै. संध्या)

राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या ठाणे जिल्हा दौऱ्यादरम्यान ‘चला शाळेत जाऊ या’ अभियानांतर्गत शाळा भेटी आणि शिक्षण विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित बैठकीत शाळांच्या पायाभूत सुविधा, शिक्षकांची उपलब्धता, रिक्त पदे, शाळांच्या जागा व इमारतींचे प्रश्न, निधीची आवश्यकता आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासंदर्भातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी, आदर्श शिक्षक (Idol Teacher) आणि शाळा व्यवस्थापन समिती प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

शिक्षणमंत्री दादाजी भुसे म्हणाले की,



“शाळा ही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी करणारी महत्त्वाची संस्था आहे. ग्रामीण भागातील असो वा शहरी भागातील, प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ‘चला शाळेत जाऊ या’ अभियानाच्या माध्यमातून शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील अडचणी समजून घेणे, शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधणे आणि स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडविण्यासाठी समन्वयाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी त्यांचे हेल्थ कार्ड तयार करण्यात येईल. तसेच शिक्षणव्यवस्थेतील रिक्त पदांवर पदभरती करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. ठाणे जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात राबविण्यात येणारे उपक्रम राज्यासाठी आदर्श ठरत असून, येथील चांगले उपक्रम राज्यपातळीवर राबविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत राबविण्यात येणारे ‘मिशन भरारी’ आणि ‘मिशन स्कॉलरशिप’ हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना देण्यासोबतच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. ‘चला शाळेत जाऊ या’ अभियानाच्या माध्यमातून शाळांमधील अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यावर भर देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाचे ८, १५, १८, २८ वर्षे मुदतीचे रोखे विक्रीस

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या ८ वर्षे मुदतीच्या १५०० कोटींच्या ७.५५ टक्के महाराष्ट्र शासनाचे रोखे, २०३४ च्या (दि.२२ एप्रिल, २०२६ रोजी उभारलेल्या) रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाचे सचिव (वित्तीय सुधारणा) विजय वाघमारे यांनी प्रसिद्धपत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

१९ ऑक्टोबर २०२६ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् १९ ऑक्टोबर २०२६ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत.

हाँगकाँग, उत्तराखंड आणि सांगलीच्या गणेशोत्सव मंडळांची राज्यस्तरीय स्पर्धेत बाजी

महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६ : पहिला ‘वेलिंग-खातू गणेशमूर्तीकार’ पुरस्कार राजन विष्णू पाटकर यांना

■ मुंबई(दै. संध्या)

‘महागणेशोत्सव : महाराष्ट्राचा राज्य उत्सव’ अंतर्गत आयोजित ‘महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६’ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर हाँगकाँग, राष्ट्रीय स्तरावर उत्तराखंड आणि राज्य स्तरावर सांगली येथील गणेशोत्सव मंडळांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. यंदा प्रथमच जाहीर करण्यात आलेल्या ‘वेलिंग-खातू गणेशमूर्तीकार’ पुरस्काराचे पहिले मानकरी मूर्तिकार राजन विष्णू पाटकर ठरले आहेत. या स्पर्धेत एकूण ३५४ गणेशोत्सव मंडळांनी सहभाग घेतला होता.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्र मंडळ, हाँगकाँग यांनी प्रथम, एडोगावा इंडिया कल्चर सेंटर, जपान यांनी द्वितीय, तर हेसन इंडियन लेडीज असोसिएशन अँड पायोनियर इंडियन्स ई.व्ही. यांनी तृतीय क्रमांक मिळविला. राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र समाज सेवा समिती, उत्तराखंड यांनी प्रथम, श्री राम युवक मंडळ, कर्नाटक यांनी द्वितीय, तर गणराया गणेश उत्सव, गुजरात यांनी तृतीय क्रमांक पटकावला. राज्यस्तरीय स्पर्धेत मोरया गणेश मंडळ, सांगली यांनी प्रथम, छत्रपती सार्वजनिक गणेश मंडळ, दीपकनगर, नांदेड यांनी द्वितीय, तर स्वराज्य गणेश मंडळ, देवनांद्रा यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे साडेसात लाख, पाच लाख आणि अडीच लाख रुपये रोख पारितोषिकासह सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेचा विस्तार जिल्हा आणि तालुकास्तरापर्यंत करण्यात आला असून, जिल्हास्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांसह तालुकास्तरीय विजेत्या मंडळांचीही घोषणा करण्यात आली आहे.

राज्य शासनाने यंदा प्रथमच ‘वेलिंग-खातू गणेशमूर्तीकार’ पुरस्कार सुरू केला आहे. या पुरस्कारासाठी राजन विष्णू पाटकर यांची निवड करण्यात आली असून, त्यांना सन्मानचिन्ह, शाल आणि अडीच लाख रुपये रोख देऊन गौरविण्यात येणार आहे.

राजन पाटकर हे पारंपरिक कौटुंबिक मूर्तिकलेचा वारसा जपणारे मूर्तिकार आहेत. भव्य, आकर्षक आणि भावपूर्ण गणेशमूर्तींच्या निर्मितीत त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. मुंबईतील प्रसिद्ध ‘गिरगावचा राजा’ गणेशोत्सव मंडळाच्या मूर्तिनिर्मितीशी त्यांचे नाव जोडले गेले आहे. तसेच वडाळा येथील जी.एस.बी. सेवा मंडळाच्या महाकाय गणेशमूर्तीचे ते मुख्य मूर्तिकार असून, गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ ते या मूर्तींची निर्मिती करीत आहेत.

पारंपरिक कलेसोबतच पर्यावरणपूरक मूर्तिनिर्मितीलाही त्यांनी प्राधान्य दिले आहे. त्यांच्या हलक्या वजनाच्या पेपर मेशीपासून तयार केलेल्या गणेशमूर्ती मुंबईसह लंडनपर्यंत पाठविल्या जातात. पाण्यात सहज विरघळणाऱ्या या मूर्ती पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या संकल्पनेला प्रोत्साहन देतात.


या स्पर्धेतील विजेत्या मंडळांचा आणि ‘वेलिंग-खातू गणेशमूर्तीकार’ पुरस्काराचे मानकरी राजन पाटकर यांचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. या समारंभात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके आणि सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व मंडळांचे तसेच विजेत्यांचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी अभिनंदन केले आहे.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



शारदाबाई पवार महाविद्यालयात बास्केटबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न

शारदानगर : दैनिक संध्या

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल (मुले) स्पर्धा ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या शारदाबाई पवार महिला आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शारदानगर, बारामती येथे दिनांक १४ व १५ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाली. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या एकूण ४० संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेदरम्यान सहभागी संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षणीय आणि चुरशीचे सामने रंगविले. खेळाडूंनी आपल्या कौशल्यपूर्ण खेळाने, चपळाईने, संघभावनेने, शिस्तीने आणि खिलाडूवृत्तीने स्पर्धेत रंगत निर्माण केली. या स्पर्धेत टी. जे. कॉलेज, खडकी या संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर टी. सी. कॉलेज, बारामती या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच ए. आय. टी., दिघी येथील महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे समन्वयक डॉ. आशिष रासकर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. रा. बा. देशमुख, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. जाधव, उपप्राचार्य डॉ. आर. एस. सुरवसे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सचिव डॉ. सुहास भैरट तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सहभागी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या क्रीडा विभाग समितीचे सदस्य प्रा. ज्ञानेश्वर खोडवे आणि महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. रणजीत देवकर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पंच आणि स्वयंसेवक यांनी मोलाचे सहकार्य केले. सर्वांच्या सहकार्यामुळे ही स्पर्धा यशस्वीरीत्या संपन्न झाली.



जुन्नरच्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा

■ काळ्या फिती लावून आंदोलन; जुन्नर वकील बार असोसिएशनचा पाठिंबा

जुन्नर : दैनिक संध्या

समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी जुन्नरसह राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १६ व १७ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून कामकाज केले. गेल्या २० ते २२ महिन्यांपासून शासनस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावाला मंजुरी मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मागणी मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा न्यायिक कर्मचारी संघटनांनी दिला आहे. जुन्नर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयातील कर्मचाऱ्यांनीही या आंदोलनात सहभागी होत नियमित कामकाज सुरू ठेवले. सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागणीला जुन्नर वकील बार असोसिएशनने पाठिंबा दर्शविला आहे. त्यामुळे सुधारित वेतनश्रेणीच्या मागणीला स्थानिक पातळीवरही पाठबळ मिळाले आहे. शासनाने प्रस्तावाला तातडीने मंजुरी न दिल्यास नोव्हेंबरमध्ये न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून, आता शासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मासिक पाळीबाबत संकोच नको; शंकांचे निरसन करा' : डॉ. मोनिका भेगडे



आळंदी : दैनिक संध्या

मासिक पाळी ही मुलींच्या जीवनातील नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यामुळे याबाबत संकोच किंवा भीती न बाळगता घरातील ज्येष्ठ महिला अथवा डॉक्टरांशी मोकळेपणाने संवाद साधावा आणि मनातील शंकांचे निरसन करून घ्यावे, असे आवाहन डॉ. मोनिका भेगडे यांनी केले. आळंदी येथील ज्ञानेश्वर विद्यालयात 'आरोग्य व मासिक पाळी' या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीविषयी जागरूकता निर्माण करणे, गैरसमज दूर करणे आणि आरोग्याबाबत योग्य माहिती देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. मासिक पाळीदरम्यान वैयक्तिक स्वच्छता राखणे, संतुलित आहार घेणे आणि आरोग्याची योग्य काळजी घेणे महत्त्वाचे आहे. या काळात कोणती खबरदारी घ्यावी, तसेच आरोग्यविषयक समस्या जाणवल्यास वैद्यकीय सल्ला कधी घ्यावा, याबाबत डॉ.भेगडे यांनी विद्यार्थिनींना सविस्तर मार्गदर्शन केले. मासिक पाळीविषयी मनात कोणताही न्यूनगंड न ठेवता योग्य माहिती जाणून घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. व्याख्यानानंतर विद्यार्थिनी आणि पालकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या वेळी प्राचार्य किसन राठोड, उपमुख्याध्यापक प्रशांत सोनवणे, पर्यवेक्षिका अनिता पडळकर, अनुजायिनी राजहंस, माता-पालक संघाच्या प्रतिनिधी, सहशिक्षिका आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

भवानीमाता मंदिरात भाविकांची अलोट गर्दी

वाल्हे : दैनिक संध्या

वाल्हे (ता. पुरंदर) गावच्या पूर्व पठारावरील ऐतिहासिक शिवकालीन भवानीमाता मंदिरात पहाटेच्या आरतीसाठी भाविकांनी अलोट गर्दी केली होती. यावेळी भवानी माता मंदिरात घटस्थापनेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. त्यामुळे मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ दिवसेंदिवस वाढत असून भाविकांकडून दर्शनासाठी शिस्तबद्ध रांगा लावल्या जात आहेत यावेळी नवरात्रोत्सवानिमित्त मंदिराची आकर्षक सजावट आणि भाविक भाऊसाहेब नारायण मदने यांनी स्वखर्चाने डोंगरावरील पायरी मार्गावर केलेली रंगीबेरंगी रोषणाईमुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण डोंगर परिसर उजळून निघत आहे. अशातच भवानीमाता डोंगर परिसर आता पर्यटन स्थळ म्हणून विकसित होत असून स्थानिक प्रशासनाकडून भाविकांच्या सोयीसाठी पथदिवे, चढण्यासाठी पायऱ्या, वाहनांसाठी कच्चा रस्ता आणि झाडे-फुलांची लागवड करून सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

वृत्तपत्र विक्रेत्यांचे कष्ट आणि वाचन संस्कृती जपण्याचे आवाहन



सासवड (ता.पुरंदर) : वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त शकिल बागवान यांचा सन्मान करताना माजी आमदार संजय जगताप

■ सासवड (दै. संध्या)

उन्हाळा, पावसाळा असो वा थंडी, भल्या पहाटे उठून वाचकांच्या घरापर्यंत वर्तमानपत्रे पोहोचवणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांचा समाजातील वाटा अनन्यसाधारण आहे. १५ ऑक्टोबर या वृत्तपत्र विक्रेता आणि वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून माजी आमदार संजय जगताप यांनी सासवड येथील दिव्यांग वृत्तपत्र विक्रेते शकिल बागवान यांचा विशेष सन्मान करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

कोरोना महामारीनंतर वृत्तपत्रांच्या खपावर परिणाम झाला आहे. ज्या कुटुंबांमध्ये ज्येष्ठ नागरिक नाहीत, त्या बहुतांश घरांमधील वृत्तपत्र बंद झाल्याचे चित्र आहे. ही चिंतेची बाब असून तरुण पिढीला वाचनाची गोडी लावण्यासाठी, सोशल मीडियावरील अफवांपासून दूर राहून खात्रीशीर ज्ञान मिळवण्यासाठी घरोघरी वृत्तपत्र सुरू ठेवावे, असे आवाहन बागवान यांनी केले आहे. केवळ सोशल मीडियावरून शुभेच्छा देण्यापेक्षा प्रत्यक्ष वाचनाची सवय जपणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

माजी आमदार संजय जगताप यांनी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या अखंड सेवेबद्दल आणि वाचन संस्कृती वाढवण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी सासवड नगरपरिषदेचे आरोग्य सभापती राजन जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, गावपाटील संग्राम जगताप, भैरवनाथ ट्रस्टचे उपाध्यक्ष पांडुरंग भोंगळे, माजी नगरसेवक हारून बागवान, ॲड आशपाक बागवान, हेमंत ताकवले, बाळासाहेब कुलकर्णी, मोबीन बागवान, ज्ञानेश्वर जगताप, अशोक पवार यांसह विजय सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

अण्णासाहेब मगर महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त उपक्रम

■ पुरंदर (दै. संध्या)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या हस्ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञान विज्ञान वाचन चळवळ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पात डॉ. पुरूषोत्तम काळे यांनी नितीन रिंढे लिखित 'लीळा पुस्तकांच्या' या पुस्तकाच्या आधारे जागतिक साहित्यातील दुर्मिळ पुस्तके, वाचन संस्कृती , पुस्तक संस्कृती आणि पुस्तकांविषयीच्या पुस्तकांचा परिचय करून दिला. डॉ. राहुल जगदाळे, उद्धव धुमाळे यांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वाचन जनजागृती अभियान अंतर्गत महाविद्यालयात सामूहिक वाचनाचा अभिनव उपक्रम व हँड वॉश दिना निमित्त हँड वॉश अभियान राबविण्यात आला. विचार आणि अभिव्यक्ती कट्टामध्ये डॉ. आ. ह. साळुंखे लिखित 'बळीवंश' या पुस्तकाचे वाचन व चर्चा करण्यात आली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे आयक्यूएसी प्रमुख डॉ. लतेश निकम, डॉ. प्रकाश हुंबाड, डॉ. दत्तात्रय टिळेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या संचालक डॉ. सविता कुलकर्णी, डॉ. नाना झगडे, डॉ. दत्तात्रय संकपाळ, डॉ. वंदना सोनवले, प्रा. अनिल देवकाते, प्रा. हेमलता धुमाळ, प्रा. उदय खंडागळे, प्रा. अर्चना जाधव, प्रा. वर्षा खळदकर, प्रा. स्वाती घारे, सारिका भुजबळ आदी उपस्थित होते. व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना जाधव यांनी केले तर आभार प्रा. वर्षा खळदकर यांनी मानले.

महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा नावाड्याचा मुलगा ते राष्ट्रपती हा प्रेरणादायी प्रवास उघडून सांगितला. सामान्य घरातील मुलगा देशाचा राष्ट्रपती होऊ शकतो हे आपल्या देशाचे वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी सांगितले.

रेडियन्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये क्रीडा महोत्सवाचा उत्साहात शुभारंभ

■ नारायणगाव (दै. संध्या)



रेडियन्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सवाची सुरुवात मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, संघभावना, शिस्त आणि खिलाडूवृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ सकाळच्या सत्रात मैदानाचे पूजन करून करण्यात आला. शाळेच्या प्राचार्या वर्षा मदभावीकर मॅडम आणि उपप्राचार्य लक्ष्मीकांत गुंडार्गी सर यांच्या हस्ते मैदानाचे पूजन करण्यात आले. या मंगलमय प्रारंभाने क्रीडा महोत्सवाला सुरुवात झाली. या क्रीडा महोत्सवाचे नियोजन शाळेचे क्रीडाशिक्षक गणेश कणसे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार आणि इयत्तेनुसार विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळच्या सत्रात मैदानावरील विविध खेळांच्या स्पर्धा, तर दुपारच्या सत्रात जलतरण स्पर्धा घेण्यात येत आहेत.

दौंडज येथील अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ वाल्हे (दै. संध्या)



पुणे -पंढरपूर पालखी महामार्गावरील दौंडज (ता. पुरंदर) जवळील तरसदरा फाट्यावर गुरुवारी (ता. १५) सायंकाळी चारच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. भरधाव खाजगी एसटी बसने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने वाल्हे येथील प्रसिद्ध आचारी व्यावसायिक सुनील राऊत (वय ५५) यांचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, सुनील राऊत हे आपल्या दुचाकीवरून जेजुरीच्या दिशेने जात असताना पाठीमागून आलेल्या एसटी बसने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, त्यांची दुचाकी सुमारे दीडशे फुटांपर्यंत फरफटत गेली. अपघातानंतर जेजुरी येथील 'शिवमल्हार रुग्णवाहिके'चे शुभम चव्हाण आणि मनोज सस्ते यांनी राऊत यांना तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृत सुनील राऊत हे 'चला हवा येऊ द्या' फेम प्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक निलेश साबळे यांचे मामा होत. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या अपघाती निधनामुळे वाल्हे व परिसरात शोककळा पसरली आहे. अपघातग्रस्त बसवर "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ" असे लिहिलेले होते. ही बस खाजगी मालकीची असून ती एसटी महामंडळाकडे भाडेतत्त्वावर देण्यासाठी पासिंग प्रक्रियेसाठी पुण्याकडे जात असल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी दिली. एसटी महामंडळाच्या सेवेत अधिकृतपणे दाखल होण्यापूर्वीच हा अपघात घडल्याने वाहनांची तपासणी आणि चालकांच्या पात्रतेबाबत आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

कॉर्पोरेट जगतात 'एक्सपिरियन्स डिझाइन'ची क्रांती

■ पुणे (दै. संध्या)

केवळ भिंती नव्हे, तर कर्मचाऱ्यांच्या अनुभवाला प्राधान्य



भारतातील कार्यस्थळे आणि व्यावसायिक आस्थापनांचे स्वरूप आता केवळ भौतिक संरचनेपुरते मर्यादित न राहता 'एक्सपिरियन्स डिझाइन'कडे वेगाने बदलत असून, संस्थेची संस्कृती आणि कर्मचाऱ्यांचा भावनिक अनुभव हा कॉर्पोरेट विश्वाचा मुख्य गाभा बनत आहे. 'सीबीआरई'च्या २०२६ मधील पाहणीनुसार ६५ टक्के कंपन्यांनी कार्यस्थळाचा अनुभव सुधारण्यासाठी ब्रँड आणि संस्कृतीवर आधारित डिझाइनला प्रथम प्राधान्य दिले आहे. या बदलत्या प्रवासात मोलाचे योगदान देणाऱ्या 'हॅपी स्पेसेस इंडिया' (Happy Spaces India) या अग्रगण्य एक्सपिरियन्स डिझाइन स्टुडिओने या क्षेत्रात आपल्या यशस्वी वाटचालीची १० वर्षे पूर्ण केली आहेत.

ग्राहकांना केवळ वस्तू किंवा सेवा नव्हे, तर तिथे मिळणारा एकूण अनुभव हवा असतो, ही संकल्पना 'स्टारबक्स', 'पीव्हीआर आयनॉक्स', 'बस्टियन' आणि 'मिराज सिनेमा' यांसारख्या हॉस्पिटॅलिटी व मनोरंजन क्षेत्रातील आस्थापनांमध्ये प्रकर्षाने दिसून येते. आता हाच दृष्टिकोन कॉर्पोरेट कार्यालयांमध्येही लागू होत असून, नव्या पिढीतील कर्मचाऱ्यांना साध्या क्युबिकल्सऐवजी उत्साही वातावरण, कॅफे-शैलीतील मोकळ्या जागा आणि सर्जनशीलतेला चालना देणारी रचना हवी आहे. एक्सपिरियन्स डिझाइनच्या मागे मानसोपचारशास्त्र (Psychology), वर्तणूक शास्त्र (Behavioural Science) आणि मानवी संज्ञान (Human Cognition) यांचा सखोल अभ्यास असतो; ज्यामध्ये प्रकाश, रंग, ध्वनी आणि नैसर्गिक घटकांच्या साहाय्याने मानवी भावना आणि एकाग्रतेवर सकारात्मक परिणाम साधला जातो. या नाविन्यपूर्ण क्षेत्रात २०१६ मध्ये क्रिएटिव्ह डायरेक्टर गणेश गडाख यांनी पल्लवी गडाख आणि अभय कुर्डुकर यांच्या सहकार्याने 'हॅपी स्पेसेस इंडिया' या 'पॅशन प्रोजेक्ट'ची स्थापना केली होती, ज्याचे रूपांतर आज एका यशस्वी व्यवसायात झाले आहे. एका छोट्या जर्मन कंपनीच्या कार्यालयापासून सुरू झालेला हा प्रवास आज मुंबईतील क्रिसिल हाऊस, ॲम्बिट हाऊस, डी बीअर्स मुख्यालय, झायडस, दिल्लीतील रोल्स-रॉयस, पुणे व बेंगळुरूमधील एसकेएफ कार्यालये आणि कोलकात्यातील २८ मजली बंधन बँकेची इमारत यांसारख्या भव्य प्रकल्पांपर्यंत पोहोचला आहे. तसेच टाटा आणि गोदरेज यांच्या कारखान्यांमध्ये व विविध कार्यालयांमध्येही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. आजवर १६ हून अधिक शहरांमध्ये ७५ हून अधिक ठिकाणी तब्बल २५ लाख चौरस फुटांपेक्षा जास्त क्षेत्रावर हॅपी स्पेसेस इंडियाने एक्सपिरियन्स डिझाइन साकारले असून, रिटेल व हॉटेल्सच्या ब्रँडिंगसह सार्वजनिक ठिकाणांच्या नूतनीकरणातही योगदान दिले आहे. "एआय आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या जगात माणसांना जिवंत आणि आनंद देणाऱ्या अनुभवांची ओढ अधिक वाढणार असून, भविष्यातील जागा केवळ कामासाठी नसून माणसांना जोडण्यासाठी व आनंद देण्यासाठी असतील," असा दृष्टिकोन हॅपी स्पेसेस इंडियाचे संस्थापक गणेश गडाख यांनी व्यक्त केला आहे.

भोंडला कार्यक्रमाचे आयोजन

■ कवठे यमाई (दै. संध्या)

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आणि शाळा व पालक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने शिरूर तालुक्यातील कवठे येमाईच्या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे माता-पालक संघाची स्थापना करण्यात आली आहे. या निमित्ताने शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता माता-पालक संघाची बैठक व पारंपरिक भोंडला कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शाळेच्या विकासामध्ये माता-पित्यांचा सहभाग वाढावा, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पालक आणि शिक्षक यांच्यात सुसंवाद निर्माण व्हावा, तसेच पारंपरिक संस्कृतीचे जतन व्हावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमात माता-पालक संघाची बैठक आणि पारंपरिक भोंडला उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शाळा, शिक्षक आणि पालक यांच्यातील नाते अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

'आकाश'ने आकाश इनव्हिक्टस - इंजिनियरिंग २.० केले लॉन्च

■ पुणे (दै. संध्या)



आकाश एज्युकेशन सर्व्हिसेस लिमिटेड, जे भारतातील आघाडीच्या परीक्षा-तयारी प्रदात्यांपैकी एक आहे, त्यांनी आकाश इनव्हिक्टस-इंजिनियरिंग 2.0 द्वारे आपल्या अभियांत्रिकी तयारी परिसंस्थेला बळकट केल्याची घोषणा केली आहे. ही एक नवीन कामगिरी-चालित शैक्षणिक रचना आहे, जी जेईई मेन, जेईई ॲडव्हान्स्ड आणि राज्य सीईटी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक सुव्यवस्थित मार्ग तयार करण्यासाठी डिझाइन केलेली आहे.

एक ३६०-अंश तयारीचा अनुभव, सहा स्तंभांवर आधारित विद्यार्थ्यांना वर्गात, त्यांच्या पुस्तकांमध्ये, त्यांच्या चाचण्यांमध्ये आणि त्यांना मिळणाऱ्या मार्गदर्शनामध्ये प्रत्येक टप्प्यावर इनव्हिक्टसचा फरक जाणवेल. हा कार्यक्रम सहा स्तंभांवर उभा आहे:

परिणाम-केंद्रित शैक्षणिक दृष्टिकोन: प्रत्येक वर्ग, सराव सत्र आणि उजळणी चक्र एका उद्देशाने नियोजित केले जाते. जेईई ॲडव्हान्स्ड, जेईई मेन, बिटसॅट आणि राज्य अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांमध्ये सर्वोत्तम शक्य रँक मिळवणे.

रँक-सिद्ध झालेली शिक्षक टीम: शिक्षक टीम ही आकाश इनव्हिक्टसची सर्वात मोठी ताकद आहे. हीच शैक्षणिक टीम आहे जिने इनव्हिक्टस अभ्यासक्रम, पुस्तके आणि चाचणी यंत्रणा उंचावली आहे. वैज्ञानिकदृष्ट्या रचलेले आणि संशोधन-आधारित अभ्यास साहित्य: या शैक्षणिक टीमने शिक्षण-शास्त्र आणि परीक्षा पद्धतींवरील सखोल संशोधनाचा वापर करून पुस्तके पुन्हा लिहिली आहेत, जी विद्यार्थ्यांना मूलभूत संकल्पनांपासून ते सर्वात कठीण प्रश्नांपर्यंत टप्प्याटप्प्याने घेऊन जातात. बुद्धिमान चाचणी. सखोल विश्लेषण: चाचणीची वारंवारता, खोली आणि कठोरता यासह पूर्णपणे पुनर्रचित चाचणी यंत्रणा, जिथे प्रत्येक चाचणी विद्यार्थ्याला त्यांची ताकद, त्रुटी आणि सुधारणा करण्याच्या नेमक्या क्षेत्रांचे स्पष्ट चित्र देते.